दैनिक
जनप्रभात
सामाजिक पीरवर्तनाचा बुलंद आवाज

लोकसभा निवडणूक २०२४: ठाण्यात निर्भयपणे मतदानासाठी पोलिसांचा रुटमार्च!

ठाणे: आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात कायदा सुव्यवस्था ठेवण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर असून, नागरिकांनी निर्भयपणे मतदान करण्यासाठी ठाणे नगर पोलिसांनी शुक्रवारी 'रूट मार्चचे आयोजन केले होते.नागरिकांनी निर्धास्तपणे आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशानुसार, परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी पायी रुट मार्चचे आयोजन केले होते. हा रूटमार्च ठाणेनगर पोलीस ठाणे येथून संध्याकाळी ५.३० वाजता सुरु झाला. चिंतामणी चौक, जांभळी नाका, कौपिनेश्वर मंदिर, जवाहर बाग अग्निशमन केंद्र, दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह, महागिरी कोळीवाडा, शासकीय विश्रामगृह येथे रूटमार्च समाप्त झाला.

* (आष्टी) वर्धा * शनिवार दि. ११/०५/२०२४ * वर्ष : २ * अंक : २९३ * पाने : ८ * किंगत : ५ रु * मुख्य संपादक:- राहुल गजरे * उपसंपादक:- राठोड रमेश पंडित * कार्यकारी संपादक:-अवधूत शेंद्रे * RNI No : MAHMAR/2020/82242

अवसान गळाल्यानेच ठाकरे, पवारांबद्दल ममत्व

नागपूर : लोकसभा निवडणुकीच्या तिस-या टप्प्यातील मतदानानंतर भारतीय जनता पक्ष १५०, जागाही जिंकू शकत नाही, हे स्पष्ट झाले आहे. पराभव होत असल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही खात्री पटली असल्यानेच याच चिंतेतून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना एनडीएमध्ये सहभागी होण्याची जाहीर ऑफर दिली आहे. शरद पवारांची एनसीपी व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला नकली म्हणून टीका करता आणि ठाकरेंबद्दल ममत्व दाखवता आणि शरद पवारांना जाहीर ऑफर देता म्हणजे नरेंद्र मोदी यांनीच पराभवावर शिक्कामोर्तब केले असे प्रत्युत्तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले.

महाराष्ट्राचे एक दिग्गज नेते ४० वर्षांपासून फिरत आहेत. बारामतीच्या निवडणुकीनंतर ते खूप चिंतेत आहेत. त्यांनी एक विधान केले आहे जे मला वाटते की, त्यांनी अनेकांसोबत चर्चा करुन केले असेल. ते इतके हताश आणि निराश झालेत की त्यांना वाटत आहे की, ४ जूनच्या नंतर राजकारणात टिकून राहायचे असेल



तर छोट्या राजकीय पक्षांना काँग्रेसमध्ये विलीन व्हायला हवे. याचा अर्थ असा की, जी नकली राष्ट्रवादी आणि शिवसेना आहे, त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला आहे. ४ जूननंतर काँग्रेसमध्ये जाऊन मरण्यापेक्षा छातीठोकपणे अजित पवार आणि एकनाथ शिंदेंसोबत या. मोठ्या अभिमानाने स्वप्ने साकार होतील, अशी ऑफरच पंतप्रधान मोदी यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना नंदूरबार येथील जाहीर सभेत दिली. यावर नाना पटोलेंनी पलटवार केला.

मोदी आता सत्तेत येत नाही

आधी पक्ष फोडले, ब्लॅकमेल केले आणि आता पुन्हा त्यांनाच आमच्यासोबत या, असे नरेंद्र मोदी सांगत आहोत. त्यामुळे नरेंद्र मोदी यांनी मान्य करावे की, आता ते काही सत्तेत येत नाहीत. आलो तरी त्यांचा आधार घेऊनच येऊ शकतो. ४०० पार नाही. आता आमच्यावर तडीपाराची वेळ आलेली आहे. म्हणूनच आता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना विनंती करत आहेत की, आमच्या बरोबर या. त्यामुळे नरेंद्र मोदी आता सत्तेत येत नाही, असा आम्ही जो दावा करत आहोत, तो दावा खरा ठरत आहे, असे नाना पटोले म्हणाले.

मोदी काहीही बोलले तरी परिणाम होणार नाही

नरेंद्र मोदी घाबरलेले आहेत. सत्तेतून बाहेर जाण्याच्या भीतीने नरेंद्र मोदी अशा पद्धतीच्या ऑफर देत आहेत. भाजपाने लोकसभा निवडणुकीत सर्व प्रकारची कार्ड वापरली पण कोणतेच कार्ड चालले नाही, हिंदु-मुस्लीम कार्डही फेल गेले. त्यामुळे नरेंद्र मोदी यांना दररोज नवे कार्ड वापरावे लागत आहे. लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ असते, नेता नाही. जनता आता नरेंद्र मोदींना कंटाळली आहे. त्यामुळे मोदी काहीही बोलले तरी आता त्याचा फारसा परिणाम होणार नाही, असे नाना पटोले म्हणाले.

४ जूनला इंडिया आघाडीचे सरकार येणार

पराभवाची भीती स्पष्ट दिसत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातच २९ जाहीर सभा घेत आहेत. मोदींच्या हातातून निवडणूक गेली आहे, हे यातून स्पष्ट होत आहे. ज्यांच्यावर कठोर टीका केली त्यांनाच ऑफर देण्याची वेळ नरेंद्र मोदी यांच्यावर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शरद पवारांना ऑफर देणे म्हणजे ४ जूनला केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येणार या राहुल गांधी यांच्या विधानाला नरेंद्र मोदी यांचा दुजोराच आहे असा दावा नाना पटोले यांनी केला आहे.

गोदावरी नदीत कोसळली जीप, दोघांना जलसमाधी

नांदेड : प्रतिनिधी

टायर फुटल्याने भरधाव क्रूझर जीप पुलावरून गोदावरी नदीत कोसळल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत जीपमधील दोघांना जलसमाधी मिळाली. ही दुर्घटना शुक्रवारी सायंकाळी ७ च्या सुमारास येळी-महाटीच्या पुलावर घडली. त्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य सुरू केले. मृतांमध्ये जीपचालक आणखी एका युवकाचा समावेश आहे.

ही क्रूझर जीप शिखाचीवाडी (ता. मुदखेड) येथील असून, शिखाचीवाडी येथील जीपचालक आणि येळी (ता. लोहा) येथील युवक चिलपिंपरी येथे बोळवण सोडून शुक्रवारी सायंकाळी येळीकडे निघाले होते. भरधाव वेगातील ही क्रूझर जीप येळी-महाटीच्या पुलावर आली असता अचानक टायर फुटले आणि जीप पुलावरून गोदावरी नदीत कोसळली.

लोकशाहीवर विश्वास नसणा-यांसोबत जाणार नाही

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवारांना सोबत येण्याच्या ऑफरवर शरद पवारांची प्रतिक्रिया दिली आहे. लोकशाहीवर ज्यांचा विश्वास नाही त्यांच्यासोबत मी कधीच जाणार नाही असे शरद पवारांनी म्हटले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना शरद पवार पुढे म्हणाले, जे



देशाच्या हिताचे नाही त्यात माझे सहकार्य असणार नाही. तर अशा विधानांमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अस्वस्थता दिसून येते असेही पुढे शरद पवार म्हणाले आहेत. तर आम्हाला नकली म्हणण्याचा अधिकार त्यांना कोणी दिला असा सवाल देखील त्यांनी यावेळी बोलताना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे संसदीय लोकशाही संकटात आहे. त्याचबरोबर आमची विचारधारा ही नेहरू आणि गांधी यांच्या विचाराची आहे असेही शरद पवारांनी पुढे म्हटले आहे.

दहावीसह बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ



पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणा-या इयत्ता दहावी परीक्षा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य मंडळ कार्यकारी परिषदेने घेतला आहे. त्यानुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जुलै- ऑगस्ट २०२४ आणि मुख्य परीक्षा-२०२५ साठी सुधारित शुल्क आकारण्यात येणार आहे. दहावीच्या नियमित तसेच पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा शुल्क ४२० रुपयांवरून ४७० तसेच खासगी विद्यार्थी अर्ज आणि नोंदणी शुल्क असे एकूण १ हजार ३४० रुपये एवढे झाले आहे.

राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी दहावीच्या सुधारित परीक्षा शुल्कासंदर्भात परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार दहावीची परीक्षा देणा-या नियमित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क ४७० रुपये, प्रशासकीय शुल्क २०, गुणपत्रिका लॅमिनेशन २० रुपये शुल्क, प्रमाणपत्र २० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय) १० रुपये, प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय) १०० रुपये तसेच खासगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज (माहिती पुस्तिकेसह) १३० रुपये आणि नोंदणी शुल्क १ हजार २१० रुपये आकारले जाणार आहेत.

पुनर्परीक्षार्थी आणि तुरळक विषय घेऊन परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांच्या सुधारित परीक्षा शुल्क ४७०, प्रशासकीय शुल्क २०, गुणपत्रिका लॅमिनेशनसह शुल्क २०, प्रात्यक्षिक परीक्षा शास्त्र विषय १० आणि प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र विषय) १०० रुपये एवढे असणार आहे, तर श्रेणी सुधारण्यासाठी प्रविष्ट होणा-या नियमित आणि खासगी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क ९३० रुपये, प्रशासकीय शुल्क २०, गुणपत्रिका शुल्क २०, प्रात्यक्षिक शास्त्र १० आणि तंत्र विषय १०० रुपये, अशी वाढ झाली आहे.

परीक्षेचा प्रकार : २०२३-२४ / २०२४-२५नियमित/ पुनर्परीक्षार्थी : ४२० / ४७०

श्रेणीसुधार : ८४०/ ९३०

खासगी विद्यार्थी अर्ज आणि नोंदणी : १२१०/ १३४०

५० हजारांची लाच घेताना पंढरपूर शहर पोलिस ठाण्यातील नाईक चर्तुभुज

सोलापूर : अपघात प्रकरणात वाहन जप्त न करणे व आरोपी न करण्यासाठी एक लाखाची मागणी करून ५० हजाराची लाच घेताना पंढरपूर शहर पोलिस ठाण्यातील नाईक. वैजिनाथ संदिपान कुंभार (वय ५२ वर्षे, पद पोलीस नाईक, म.नं. ३८०, नेमणूक पंढरपूर शहर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण रा. अर्थव बिल्डींग, ब्लॉक नं. २०७, पुजारी सिटी, इसबावी पंढरपूर ता. पंढरपूर, जि. सोलापूर) यांना लाचलुचपत प्रतिबंधक पोलिसांनी रंगेहात पकडले आहे.



याप्रकरणी पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथेभ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे आरोपीचे नांव व कार्यालयआलोसे वैजिनाथ संदिपान (वय ५२ वर्षे, पद पोलीस नाईक, ब.नं. ३८०, नेमणूक पंढरपूर शहर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण रा. अर्थव बिल्डींग, ब्लॉक नं. २०७, पुजारी सिटी, इसबावी पंढरपूर ता. पंढरपूर, जि. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे प्रक्रिया सुरू आहे. याप्रकरणी हाकिकत अशी की पंढरपूर शहर पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण गु.र.नं. ४४/२०२४, भा. द.वि. संहिता १८६० चे कलम २७९. ३३७, ३३८ व मोटार वाहन अधिनिय १९८८ चे कलम १३४ (ए), १३४ (बी) १७७, १८४ प्रमाणे अज्ञात वाहनाविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यात तक्रारदार यांची मोटार सायकल न दाखविण्यासाठी तसेच सदर गुन्ह्यात तक्रारदार यांना आरोपी न करण्यासाठी यातील लोकसेवक वैजिनाथ संदिपान कुंभार, यांनी तक्रारदार यांचेकडे १,००,०००/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडी अंति ५०,०००/- रुपये लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य करुन सदरची लाच रक्कम स्यता स्विकारले वरून रंगेहात पकडण्यात आली आहे.

अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे/खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार, पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार पोहेकों अतुल घाडगे, पोहेकों सलीम मुल्ला, पोना स्वामीराव जाधव, चापीकों शाम सुरवसे यांनी ही कारवाई केली.

जालन्यात मतदानापूर्वीच आढळला मतदान कार्डांचा ढीग

जालना : चौथ्या टप्प्यातील मतदानापूर्वीच जालन्यात बेवारस मतदान पत्रे चक्क कच-याच्या ढिगा-यात आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान, अद्याप येथील लोकसभा निवडणुकीसाठी मतदान झालेले नाही. शहरातील अंबड रोडवरील कांचननगर येथील फोटो स्टुडिओ शेजारी तब्बल १७६ मतदार ओळखपत्र बेवारस अवस्थेत गुरुवारी सकाळी आढळली. याबाबत माहिती मिळताच निवडणूक अधिकारी व महसूल कर्मचा-यांनी घटनास्थळावरुन धाव घेऊन ही ओळखपत्रे ताब्यात घेऊन पंचनामा केला आहे.



याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध कदीम पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नूतन वसाहत भागातील रहिवासी शुभम नारळे यांना गुरुवारी सकाळी परिसरात मतदार ओळखपत्र बेवारस अवस्थेत आढळून आले. याबाबत, त्यांनी तत्काळ प्रशासनाशी संपर्क साधत जिल्हा निवडणूक विभाग व कदीम पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर दुपारी महसूल कर्मचा-यांनी मतदान ओळखपत्रांचा पंचनामा केला.

कच-याच्या ढिगा-याजवळ ही मतदार ओळखपत्रे अज्ञात व्यक्तीने टाकलेली होती. याबाबत माहिती मिळताच उपविभागीय अधिका-यांनी त्याचा पुढील तपास सुरू केला आहे. सापडलेल्या ओळखपत्रांची नावे बीएलओमार्फत तपासणीचे काम सुरू करण्यात आले असल्याचे माहितीही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. मात्र, मतदानापूर्वीच येथे अशाप्रकारे मतदान ओळखपत्रे आढळून आल्याने परिसरात बोगस मतदानाची चर्चा रंगली आहे.

लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत राज्यातील पहिल्य तीन टप्प्यात मतदान उत्साहात पार पडले. राजकीय नेत्यांच्या सभा, उन्हासह प्रचाराचा धुमधडाका आणि गाठीभेटींसाठी उमेदवारांची होणारी लगगब सर्वत्र दिसून आली. तिस-या टप्प्यात मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील ११ मतदारसंघात मतदान पार पडले. यावेळी, सांगोल्यातील मतदान केंद्रावर चक्क ईव्हीएम मिशन जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना घडली. काही ठिकाणी बोगस मतदानाचाही प्रकार झाल्याचा आरोप होत आहे.

दानवे विरुद्ध काळे लढत रंगात

जालना लोकसभा मतदारसंघासाठी चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी मतदान होत आहेत. येथील लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून रावसाहेब दानवे तर महाविकास आघाडीकडून कल्याणराव काळे यांच्यात थेट लढत होत आहे. तर, मराठा आरक्षणाचा मुद्दा याच जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून राज्यभर पुन्हा पेटला होता. त्यामुळे, मनोज जरांगे पाटील व मराठा आरक्षणाचा इम्पॅक्ट येथील मतदारसंघात होऊ

डॉक्टरच्या हॉफ टाईम ने आपल्या दवाखान्याचे वाजले तीन- तेरा

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात पूर्णवेळ डॉक्टर नियुक्ती फक्त कागदावर.

आपला दवाखाना मागील सहा महिन्यापासून ऑक्सिजनवर.

डॉ. पूर्वा दारोकार यांची नियुक्ती आपल्या दवाखाना आष्टी येथे परंतु मॅडमचे कर्तव्य भारसवाड्यात.


आपला दवाखाना सुरुवातीच्या काळात प्रतिदिन रुग्णसंख्या ७० ते ८० च्या जवळ.



आष्टी (शहीद):- प्रतिनिधी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आष्टी शहरात सुरू होऊन जवळपास एक वर्षाचा कालावधी होत आहे. या एक वर्षात सुरुवातीचे दोन-तीन महिने दवाखाना सुरळीत चालला असून रुग्णसंख्या ७० ते ८० प्रमाणे होती. परंतु तत्कालीन डॉक्टर पुढील अभ्यासाकरिता राजीनामा देऊन गेल्यानंतर या दवाखान्याला अवकाळा आली असून आता कुठे या दवाखान्यात आरोग्य प्रशासनाकडून स्थानिक रहिवाशी महिला डॉक्टरची नियुक्ती केली परंतु ही नियुक्ती आपल्या दवाखान्याची ३-१३ वाजविण्यात कारणीभूत ठरत आहे. आष्टी येथील काही रुग्णांनी दैनिक जनप्रभातशी डॉक्टर च्या अनउपस्थिती बाबत तक्रार केली असता दैनिक जनप्रभात चे प्रतिनिधी यांनी गैर हजरी बाबत माहिती काढली.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांचा नियमित वेळ हा दुपारी दोन ते रात्री दहा पर्यंत असून त्या ठिकाणी नेमलेल्या डॉ.पूर्वा दारोकार ह्या आपल्या सोयीनुसार साडेचार ते सहा पर्यंत दवाखान्यात उपस्थित असतात. त्यानंतर त्या आपल्या खाजगी दवाखाना भारसवाडा येथे आपली सेवा देत असून डॉ. दारोकर मॅडम यांच्या आदेशाने दवाखान्याची वेळ दुपारी दोन ते सहा पर्यंत करण्यात आली होती. दवाखान्याचे वेळापत्रकावर दहाच्या जागेवर सहा असे चित्र चिपकवलेले होते. दैनिक जन प्रभातचे प्रतिनिधी यांनी चौकशी केली असता आपला दवाखान्याचे कर्मचारी यांनी चिपकवलेले सहा चे चित्र काढून टाकले .

अशा या डॉक्टरमुळे आपला दवाखाना ऑक्सीजन वर आला असून यात डॉक्टर पूर्वा दारोकार यांना नेमकी सूट कोणी दिली आहे हा चौकशीचा प्रश्न आहे. तर या डॉक्टरवर वरिष्ठ काय कारवाई करेल याकडे आष्टी वासियांचे लक्ष लागले आहे.





संपादकीय....

उष्मा उसळला; कान झाका!

पंतप्रधानांचा जनाधार देशभर; तर पित्रोदा यांस काँग्रेसमध्येही सर्वांचा टेकू नाही जो होता तो काढला गेला, हे बरे झाले वास्तविक पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दूरसंचारतज्ज्ञ, काँग्रेसचे सॅम पित्रोदा यांच्यावर एकाच संपादकीयात भाष्य करणे अयोग्य. पण तशी वेळ आली आहे खरी. निमित्त आहे ते उभयतांचे वक्तव्य. वास्तविक जनप्रियतेच्या मुद्द्यावर पंतप्रधान आणि पित्रोदा यांची तुलनाच होऊ शकत नाही. पंतप्रधानांचा जनाधार देशभर; तर पित्रोदा यांस समस्त काँग्रेसचाही टेकू नाही. जो होता तोही काढला गेला. देशातील दूरसंचार तंत्रज्ञान क्रांतीचे ते जनक. राजीव गांधी यांच्या कालात जे काही भारतीय दूरसंचारात आमूलाग्र काम झाले, त्याचे प्रणेते ते पित्रोदा. ही दूरसंचाराची त्यांची सवय अद्यापही गेलेली दिसत नाही. कारण दूर तिकडे अमेरिकेत राहून ते भारतातील घडामोडींविषयी काहीबाही पण अनावश्यक भाष्य करत बसतात आणि त्यांच्या पाठीराख्यांनाच संकटात आणतात. हा दूर-उच्चाराचा नको तो उद्योग त्यांनी डझनभर वेळा तरी आतापर्यंत करून काँग्रेसला संकटात आणले. निवडणुका हा काही खरे तर मानववंशशास्त्र (ॲन्थ्रोपोलॉजी) या विषयावर ऊहापोह करण्याचे स्थळ आणि काळ नाही. पण तरीही पित्रोदांना राहवले नाही आणि भारतीय कोण कोणासारखे दिसतात वगैरे काहीबाही ते बोलून गेले. मूळ भारतीय कोण, आर्य की द्रविड, कोणी बसक्या नाकाचे का आहेत आणि कोणाचा वर्ण इतका सावळा कसा, कोणाकोणापासून या प्रांतात वंशसंकर झाला वगैरे मुद्दे त्यांच्या बोलण्याच्या मुळाशी असणार. पण वेळ चुकली त्यांची. त्यामुळे त्यांचा मुद्दा राजकीय प्रतलावर गेला आणि अखेर या पित्रोदांस काँग्रेसच्या परदेशस्थ कार्यप्रमुखाचा राजीनामा द्यावा लागला. बरे झाले. आता त्यांस दूरसंचार आणि मानववंशशास्त्र, अमेरिका आणि भारत यांतील कररचना, अयोध्या मंदिर आणि रोजगारनिर्मिती अशा मूलगामी विषयांवर चिंतन आणि नंतर भाष्य करण्यास वेळ मिळेल. उच्चविद्याविभूषित पण स्थानिक संवेदनांस अनभिज्ञ अशी एक विद्वानांची फौज काँग्रेसच्या पदरी आहे. मणिशंकर अय्यर, सॅम पित्रोदा ही मंडळी अशी देशस्थ अथवा परदेशस्थ अभारतीय. अशांच्या वक्तव्याने संकटात पडणे त्या पक्षास नवे नाही. त्यामुळे पित्रोदा यांच्या अस्थानी, अकाली वक्तव्यांस काँग्रेस सरावलेली असणार. तरीही त्यांना पक्षातील पदापासून दूर करण्याचा निर्णय घेतला गेला ते योग्य. उगाच खंडीभर वरणात घाण करण्याची आणखी एखादी संधी त्यांना आता मिळणार नाही. हे झाले पित्रोदांबाबत. तसे ते दुय्यम पदावरचे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्यांकडे भाजपेतर जनांस दुर्लक्ष करणे तसे सोपे. पण पंतप्रधानांचे काय?

त्यांनी आकस्मिकपणे निवडणूक प्रचारात अदानी-अंबानी यांनाच हात घातला. त्यामुळे हे दोन उद्योगसमूहही दचकले असणार. त्यांनाही पंतप्रधानांच्या विधानांमागील कार्यकारणभाव नक्की काय, या प्रश्नाचे उत्तर अद्यापही मिळाले नसेल. हिंदू-मुस्लीम, पाकिस्तान, शहजादे इत्यादी हुकमी विषय हाताशी असताना पंतप्रधानांनी थेट या दोन उद्योगसमूहांनाच हात घातल्याने अर्थविश्वातही खळबळ उडाली. इतकी की 'सीआयआय' आणि 'फिक्की'सारख्या उद्योगपतींच्या संघटनांच्या तोंडास कोरड पडून त्यांचा चेहरा फिका पडला म्हणतात. या दोन उद्योगसमूहांचा केवळ उल्लेखच पंतप्रधानांनी केला असे नाही. तर या दोन कंपन्यांचे राहुल गांधी यांच्याशी काही 'डील' झाले आहे किंवा काय असे त्यांनी विचारले आणि या दोन कंपन्यांकडून राहुल गांधी यांस टेम्पो भरभरून 'चोरी का माल' मिळाला असल्याची शंका पंतप्रधानांनी व्यक्त केली. राहुल गांधी गेली पाच वर्षे या दोन उद्योगपतींच्या नावे खडे फोडत होते आणि आता मात्र ते त्यांचे नावही काढत नाहीत; याचा अर्थ त्यांस या दोन उद्योगपतींकडून काही 'घबाड' मिळाले असणार, असा पंतप्रधानांच्या म्हणण्याचा अर्थ. इतक्यावरच हे थांबले असते तरी ठीक म्हणता आले असते. पण पंतप्रधानांनी हे दोन उद्योगपती आणि राहुल गांधी यांची काँग्रेस यांच्यात 'सौदा' झाल्याचा आरोप केला आणि या 'व्यवहारात' काळा पैसा वापरला गेला असेही त्यांनी सूचित केले. एरवी कोणा येरागबाळ्याने अशी काही विधाने केली असती तर त्याकडे सुखसमाधानाने दुर्लक्ष करता आले असते. पण साक्षात देशाचे पंतप्रधानच हे बोलले असल्याने ही विधाने अशीच सोडून देणे त्या पदासाठी अपमानास्पद ठरेल. तो धोका टाळून पंतप्रधानांच्या या महत्त्वाच्या सत्यकथनावर काही प्रश्न नम्रपणे उपस्थित करावे लागतात.

सगळ्यात कळीचा मुद्दा आहे काळा पैसा हा. तो अजूनही आहे असे खुद्द पंतप्रधानांनाच वाटत असेल तर मग ते आठ नोव्हेंबर २०१६ या दिनी सायंकालीन आठच्या ठोक्याला केलेल्या 'कागज का टुकडा' निर्धाराचे नेमके काय झाले? देशातील काळा पैसा एका झटक्यात खतम करण्यासाठी तर ते निश्चलनीकरणाचे बुद्धिमान पाऊल आपल्याकडे उचलले गेले ना! त्यामुळे रोकड कमी होऊन पाठोपाठ काळा पैसाही त्यामुळे कमी होत होत नाहीसा होणार होता. पण सध्या तर जिकडेतिकडे नोटांच्या चळतीच्या चळती विविध सरकारी यंत्रणांना नेमक्या विरोधकांकडे गवसत आहेत आणि पंतप्रधानही काळ्या पैशाचा उल्लेख करीत आहेत. म्हणजे ते निश्चलनीकरण व्यर्थ ठरले असे मानायचे काय? त्याबाबत पंतप्रधान नाहीत, पण निदान अर्थवेत्त्या निर्मला सीतारामन या तरी जनतेचे काही प्रबोधन करतील काय? त्याची फारच गरज आहे. कारण इतके दिवस आपण निश्चलनीकरण किती यशस्वी झाले हे ऐकत होतो. पण आता पंतप्रधानच काला धन, टेम्पोभर रोकड, सौदा इत्यादी शब्दप्रयोग करताना दिसतात. याचा अर्थ या देशास आता आणखी एका निश्चलनीकरणाची गरज आहे, असा काढायचा काय? दुसरा मुद्दा ही टीका नक्की कोणावर होती, हा! ती राहुल गांधींवर होती असे मानावे तर तीमुळे प्रत्यक्षात अधिक बदनामी अदानी-अंबानी यांची होते, त्याचे काय? पंतप्रधानांच्या विधानाचा सरळ अर्थ 'हे दोन उद्योगपती असे बंद दरवाजाआड व्यवहार करतात आणि राजकीय पक्षांना खोऱ्याने पैसा देतात' असा होतो. तो या उद्योगसमूहांवर अन्याय करणारा आहे. इतक्या कष्टाने, इमान राखत उभ्या राहिलेल्या साम्राज्याची अशी बदनामी पंतप्रधानांकडूनच होत असल्याचे पाहून या दोन विशाल उद्योगपतींच्या विशाल हृदयांस किती घरे पडली असतील! आणि मुख्य म्हणजे इतक्या नीतिमान सरकारच्या काळात देशातील अत्यंत आघाडीचे, महत्त्वाचे, ज्यांच्यामुळेच या देशातील पायाभूत सोयीसुविधा जनतेसाठी उभ्या राहात आहेत असे उद्योगपती विरोधी पक्षांस इतकी मोठी रक्कम, तीही रोखीने आणि टेम्पोतून देत असतील तर या उद्योगपतींवर पंतप्रधानांनी कठोरातील कठोर कारवाई करायला हवी. या कारवाईसाठी आणखी एक कारण आहे.

लोकशाही संसद म्हणजे अनुभव मंटप!

भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय व सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष म्हणून संत बसवेश्वर यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्रातील सोलापूर येथील मंगळवेढा येथे त्यांनी तब्बल ३१ वर्षे वास्तव्य केले होते. बसवेश्वरांनी मंगळवेढ्यातूनच लिंगायत धर्माची स्थापना केली, असे सांगितले जाते. सदर लेखात बापू- श्रीकृष्णदास निरंकारी ज्ञानवर्धक संकलित माहिती मांडत आहेत... संपादक.

महात्मा बसवेश्वर महाराज यांना बसव, बसवण्णा असेही म्हणतात. हे कर्नाटकातील संत, समाजसुधारक होते. त्यांनी हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेविरुद्ध व अन्य हानिकारक प्रथांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी निर्गुण, निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला.

शालिवाहन शके दहाव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म झाला. काहींच्या मते तो इंगळेश्वर जि. विजापूर या गावी झाला असावा. त्यांच्या जन्मकाळाविषयी मतभेद असले, तरी सामान्यतः त्यांचा जन्म आजच्या तिथीला- वैशाखातील अक्षय्य तृतीयेला झाल्याचे मानले जाते. त्यांचे वडील मणिराज ऊर्फ भादरस हे बागेवाडी आगाराचे भांडारप्रमुख होते. त्यांच्या पत्नी मादुलांबा- मादंबा परम शिवभक्त होत्या. बसवेश्वरांच्या भावाचे नाव देवराज व बहिणीचे नाव नागम्मा होते.

बसवेश्वर कर्मठ विधींना विरोध करत. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी मुंजीची तयारी झाल्यावर मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे, असे म्हणून मुंज करून घ्यायचे नाकारले आणि घर सोडून ते कूडलसंगम जि. विजापूर येथे निघून गेले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते. तेथे बसवेश्वरांनी बारा वर्षे वास्तव्य केले. कूडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींचा अभ्यास केला. त्यांचा विवाह त्यांच्या मामाच्या मुलीशी झाला. तेव्हा ते सोलापुरातील मंगळवेढा येथे आले. तेथे ते एकतीस वर्षे राहिले. भारतीय लोकशाही संसदेची स्थापना बसवण्णांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद म्हणजेच अनुभव मंटपाची स्थापना केली. या अनुभव मंटपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करावी, यावर चर्चा करण्याचे कार्य चालत असे.

बसवण्णांनी समाजातील रूढीपरंपरा, वाईट चालीरीती यांना विरोध करून समाजाच्या हितकारक गोष्टींची अंमलबजावणी करणारी नवीन यंत्रणा तयार केली. बाराव्या शतकातील आदर्श प्रशासक, समतेचे प्रणेते म्हणून महात्मा बसवेश्वरांना ओळखले जाते. सर्व प्रथम लोकशाही मूल्याची सुरूवात ही म.बसवेश्वरांनी १२व्या शतकात अनूभव मंटपाच्या माध्यमातून केल्याचे वचनसाहित्यातून दिसून येते. एकूणच त्यांनी वचनसाहित्यात समता, मूल्य, न्याय, बंधूता, एकात्मता तसेच स्वातंत्र्य, अधिकार, नियंत्रण व शिस्त, सूशासन आणि प्रशासन आदी बाबींवर सखोल विवेचन केले आहे. सद्यस्थितीत शासन व प्रशासन या विचारांचा अवलंब केल्यास निश्चितच देशात निर्माण होणारी विषमता, हिंसा, भेदभाव व जातीय राजकारण इ.समस्यावर पायबंद- आळा घालता येईल. परिणामतः चांगले सुशासन व प्रशासन व्यवस्था निर्माण होइल.

समाजाचे ऐक्य म्हणजे येथील अध्यात्मिक शक्तींचे ऐक्य होय, हे तत्त्व बसवण्णा जाणून होते. भारतातील अध्यात्माचे ऐक्य साधण्यासाठीच त्यांनी अनुभव मंटप ही संस्था स्थापन केली. या संस्थेत प्रवेश घेण्यास कोणासही बंदी नव्हती. स्त्रियांनासुद्धा संस्थेचे सभासद होता येत होते. जातीभेदाला तर थाराही नव्हता. प्रत्येक माणसाला धार्मिक जीवन जगण्याची समान संधी मिळावी. त्या धार्मिक जीवनात जन्म, जात, व्यवसाय, स्त्री-पुरुष म्हणून भेदभाव केला जाऊ नये. भारतात प्राचीन काळापासून भगवान शिवाची उपासना होत आली आहे. नंदी हा भगवान शिवाचे वाहन आणि शिष्य. कृषिप्रधान भारतात वृषभ- बैल हा शेतकऱ्यांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू ठरणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. वृषभाला नंदीच्या रूपात पूजण्याची प्रथाही भारतात प्राचीन काळापासून आहे. सोमवार हा भगवान शंकराचा वार मानला गेला आहे. यादिवशी बैलांना शेतीकामाला जुंपण्यात येत नाही. शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता भाव ठेवून आठवड्यातून एकदा विश्रांती देण्याची परंपरा भारतीयांच्या तरल संवेदनेची ओळख करून देण्यास पुरेशी आहे. पशु-पक्षांचे शोषण होऊ नये यासाठी २१व्या शतकातील मानव कायदे बनविताना दिसतो, परंतु भारतामध्ये प्राणिमात्रांवर दया करणेच नव्हे, तर ईश्वररूपात पाहणेदेखील दैनंदिन आचरणाचा अविभाज्य भाग आहे. ९०० वर्षांपूर्वी समाजात समरसता निर्माण करणाऱ्या महात्मा बसवेश्वरांना साक्षात नंदीचा अवतार मानले गेले. संस्कृतमधील वृषभ या शब्दाचे बसव हे कन्नड रूप. सन ११३१मध्ये बसवण्णांचा जन्म झाला. बसवला लोक प्रेमाने बसवण्णा म्हणत. पुढे लोकांनी त्यांना आदराने बसवेश्वर हे नामाभिधान दिले.

समुद्राला भरती येते, त्यानंतर ओहोटी येते. सूर्य मध्यावर येतो आणि नंतर मावळतोही. समाजाचेही तसेच असते. या भूमीने व्यास, कपिल, कनाद, गौतम, चार्वाक, महावीर आणि बुद्ध यांच्यासारखे श्रेष्ठ तत्त्ववेते, चंद्रगुप्तांसारखे सम्राट निर्माण केले. समाज भरभराटीला आला आणि नंतरच्या काळात अधोगतीही झाली. निरर्थक अंगरूढींनी उच्छाद मांडला. स्पृश्य-अस्पृश्यता यांसारख्या समाजाला मागे खेचणाऱ्या प्रथा बोकाळल्या. दुर्दैव असे की हे सारे धर्माची झूल पांघरून सुरू होते. अशावेळी बसवण्णा यांचा उदय झाला. आधुनिक सुधारणावाद्यांपेक्षा बसवण्णा वेगळे होते. १९व्या शतकातील थोर सुधारक स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत सांगायचे तर आधुनिक सुधारणावाद्यांना धर्माची मोडतोड केल्यावाचून सामाजिक सुधारणा करणे अशक्य वाटते. अलीकडच्या काळात असा प्रयत्न ज्यांनी ज्यांनी केला, त्यांना अपयश मिळल्याचे दिसते. कारण त्यांच्यापैकी फारच थोड्यांनी स्वत:च अभ्यास केला होता आणि सर्व धर्मांची जननी असलेल्या आपल्या धर्माचे शिक्षण, त्यासाठी आवश्यक ती साधना तर एकाचीही झाली नव्हती. समाजाची अवनती होते, ती धर्मामुळे नव्हे तर धर्मतत्त्वांचे योग्यरीतीने पालन न केल्याने, हे महात्मा बसवेश्वर जाणून होते. कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगम ठिकाणी असलेल्या गुरुकुलात ज्ञानी गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले होते. विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्त्वे कन्नडमधून लिहिली. बसवण्णांपूर्वी कन्नड वाङ्मय फक्त पद्यस्वरूपात लिहिले गेले होते. बसवण्णांनी गद्यातून वचने लिहिण्यास सुरुवात केली, त्यामुळे कन्नड भाषेतील गद्य वाङ्मयाचा विकास झाला. कित्येक शिवशरणांनी म्हणजे शैवसंतांनी बसवण्णांचे अनुकरण केले. या वचनांचा लोकांमध्ये प्रचार झाला. वचनांच्या माध्यमातून समाजाच्या निरनिराळ्या बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. समाजाची नैतिक व धार्मिकदृष्ट्या रचना कशी असावी, हे सांगण्यात आले. प्रत्येकाने आपल्या पोटापाण्याचा व्यवसाय करतानाच प्रामाणिक व आध्यात्मिक जीवन जगायला मार्गदर्शक ठरतील अशी तत्त्वे बसवेश्वरांनी समाजाला दिली. कर्नाटक आणि दक्षिण महाराष्ट्रातील खेड्यांतील लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झालेली दिसतात. बसवण्णांचे समाजपोषक विचार आणि आचार याने प्रभावित होऊन चालुक्य राजाच्या दरबारात बसवण्णांना मानाचे स्थान मिळाले. सर्वसामान्यांच्या उन्नतीची कामे करण्यात बसवण्णांचा हातखंडा होता. निस्पृहता आणि कर्तृत्वाच्या बळावर बसवण्णा राज्याच्या मंत्रिपदी आरूढ झाले. सत्ता आणि वैभव, कीर्ती पायाशी लोळण घेतानाही बसवण्णा आध्यात्मिक नीति मूल्यांपासून ढळले नाहीत. या समाजाचे ऐक्य म्हणजे येथील अध्यात्मिक शक्तींचे ऐक्य होय, हे तत्त्व बसवण्णा जाणून होते. भारतातील अध्यात्माचे ऐक्य साधण्यासाठीच त्यांनी अनुभव मंटप ही संस्था स्थापन केली. या संस्थेत प्रवेश घेण्यास कोणासही बंदी नव्हती. स्त्रियांनासुद्धा संस्थेचे सभासद होता येत होते. जातीभेदाला तर थाराही नव्हता.

मनापासून केलेले प्रत्येक काम हीच खरी शिव उपासना हे त्यांच्या कायक व कैलास सिद्धांताचे सार होय. शारीरिक श्रम वा व्यवसाय हाच स्वर्ग- कैलास आहे. कोणत्याही प्रकारचे शारीरिक श्रम हे हीन दर्जाचे नाहीत, असे सांगून त्यांनी श्रमप्रतिष्ठा वाढविली. कायक हे केवळ पैशासाठी सांगितलेले नाही. तसेच ते कर्मसिद्धांतावर आधारलेले नसून त्यात व्यक्तीला व्यवसायस्वातंत्र्य देण्यात आलेले आहे. श्रमप्रतिष्ठेबरोबरच गरजेनुसार संपत्तीची विभागणी करावी, ही विचारसरणी (दासोह) मांडल्यामुळे बसवेश्वरांची वृत्ती समाजवादी, समतावादी होती, असे दिसून येते. दासोह सिद्धांतात आपण कमावलेले धन केवळ स्वतः पूरते न वापरता त्याचा समाजासाठी उपयोग करण्याची संकल्पना त्यांनी मांडली.

बसवेश्वरांच्या उपदेशामुळे वेगवेगळ्या व्यवसायांना, विशेषतः ग्रामोद्योगांना, प्रोत्साहन मिळाले आणि सर्व व्यावसायिकांमध्ये समभाव निर्माण झाला. बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीला शुद्र, बहिष्कृत समजले जात असे. स्त्रीयांवर अन्याय होत होता, म्हणून त्यांनी स्त्रियांसाठी मोठे भरीव कार्य केले. स्त्रियांना मत स्वातंत्र्याचा अधिकार दिला. त्यांना धार्मिक आणि आध्यात्मिक हक्क दिले. स्त्रियांची अशुद्धतेच्या कल्पनेतून आणि पंचसुतका पासून सुटका केली. तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२व्या शतकात घडला. मागास जातीतील संत हरळय्या यांचा मुलगा शीलवंत व मधुररस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडवून आणला. असा आंतरजातीय विवाह तोही १२व्या शतकात हे खूपच क्रांतिकारक आणि धाडसी होतं कारण आजही म्हणजे ९०० वर्षांनंतरही आपल्या समाजाची असा विवाह स्वीकारण्याची पूर्ण तयारी झालेली दिसत नाही. बसवेश्वरांनी कल्याण येथे निर्माण केलेली शिवानुभवमंटप म्हणजेच अनुभवमंटप ही संस्था जागतिक धर्मे तिहासातील अनन्यसाधारण संस्था होय. हे त्या काळातील पहिले लोकशाहीचे संसद होते. वेगवेगळ्या जातींतील व व्यवसायांतील भक्त म्हणजेच शिवशरण येथे एकत्र जमत आणि विविध विषयांवर चर्चा करीत असत. ही चर्चा लयबद्ध गद्यातून होत असे. तत्कालीन शिवशरण-शरणींची अशी वचने पुढे संग्रहीत करण्यात आली. मंटपातील चर्चेच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये जागृती केली. येथे परिसंवादाच्या स्वरूपाची जी चर्चा होत असे, तीच कन्नड साहित्यामध्ये वचनसाहित्याच्या रूपाने प्रसिद्ध झाली. वचन साहित्यातून त्यांनी समाजात प्रबोधनरूपी विचार पेरले.

!! जयंतीनिमित्त भगवान बसवेश्वरांना अनंतकोटी दंडवत प्रणाम !!

****

-संकलन व सुलेखन -
संतचरणरज: बापू- श्रीकृष्णदास निरंकारी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त दूरभाष- ७१३२७९६६८३.

शिक्षण हक्क हवा, मात्र पात्र विद्यार्थ्यांसाठीच!

शिक्षणाचा हक्क नेमका कोणासाठी? सरकारी व अनुदानित शाळांच्या एक किलोमीटर परिघात असलेल्या खाजगी शाळात शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रवेश न देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने तिथे आपल्या मुलांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या लाखो पालकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांचे विलीनीकरण करण्याची राज्य सरकारची भूमिका आणि त्यानंतर खासगी शाळांतील २५ टक्के आरक्षण नाकारण्याचा निर्णय शिक्षण हक्क संकुचित करण्याचा प्रयत्न होता.

सरकारी शाळांकडे विद्यार्थ्यांच्या ओढ वाढवण्यासाठी, पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी, गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि शिक्षकांवरील अशैक्षणिक कामे कमी करण्यापासून त्यांना उत्तम प्रशिक्षण देण्यापर्यंत प्रयत्न करायला हवेत, पण तसे होत नाही. सरकारने शिक्षणाला मर्यादित करण्याचे प्रयत्न थांबवावेत. नामांकित शाळेत प्रवेश मिळावा अशी इच्छा प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची व पालकांची असते. ज्या शाळेत देणगी शिवाय, शिफारशी शिवाय प्रवेशच मिळत नाही, त्या शाळेत मध्यमवर्गीय व दारिद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी मिळणे, हा त्यांचा हक्कच आहे. भालचंद्र मुणगेकर यांना चांगले शिक्षक मिळाले व भालचंद्र मुणगेकरांसारखे विद्यार्थी आम्हाला मिळाले हे आमचे भाग्य असे शिक्षक म्हणत. शिक्षण ही द्विमार्गी प्रक्रिया आहे. आरटीई अंतर्गत राखीव प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांमधील मुलांना घरापासून तीन किलोमीटर अंतरावरील खासगी शाळेतील २५ टक्के जागांवर प्रवेश देण्यात येतात. हे प्रवेश लॉटरी पद्धतीने जाहीर होतात. प्रवेशासाठी पालकांना ओळखपत्र, जातप्रमाणपत्र, वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागतो. बहुतेक पालकांची घरे शाळेजवळ नसल्याने त्यांनी प्रवेश मिळवण्यासाठी आपण शाळेत जवळ राहात असल्याचे भासवले आहे. शिक्षण हे शिकणे रहिले नसून भासवणे झाले आहे.



काहीवेळा पालकांना शिक्षण हक्काची गंधवार्ताही नसते आणि ते प्रयत्नही करत नाहीत. त्यामुळे जागा शिल्लक राहिल्यास श्रीमंत आणि मध्यमवर्गीय पालक या सर्व बाबींची पूर्तता करून त्यांची जागा अडवतात. अशा स्थितीत शिक्षण हक्क कायद्याचा उद्देश सफल होतो असे कसे म्हणता येईल? याचे सर्वेक्षण करून या बाबतीत काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे, तरच वंचितांचे, दुर्लक्षित राहिलेल्यांचे शिक्षण होऊन ते मूळ प्रवाहात येतील. यशोशिखरावर जाण्यासाठी असत्याच्या पायघड्या व भ्रष्टाचाराची शिडी हे राजमार्ग झाले आहेत. शंका असूनही कार्यवाही करता येत नाही ही आजची परिस्थिती आहे.

कशाला हवी पहिली फेरी, दुसरी, तिसरी फेरी. संबंधित शाळेत एक स्वतंत्र विभाग असावा व त्या भागातील विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना साहाय्य करण्याची जबाबदारी या विभागातील शिक्षक व कर्मचाऱ्यांवर सोपवावी. विद्यार्थ्यांना व पालकांना साहाय्य करावे आणि विद्यार्थी खरोखरच आर्थिकदृष्ट्या दुर्बळ गटातील आहे का, याची खात्रीही करून घ्यावी. असे केल्यास खोटे भाडे करारपत्र दाखवून प्रवेश घेणाऱ्यांना चाप बसेल. शिक्षण हक्क कायद्याचा अशाप्रकारे गैरवापर करण्याच्या प्रश्नावर एक हिंदी चित्रपटही आहे. २००९ पासून शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आला होता. किती तरी विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी खोटी कागदपत्रे सादर करून प्रवेश मिळवला व शिक्षण प्रवाहात सामील झाले याचे उत्तरदायित्व कोणाचे? बोगस कागदपत्रांची पूर्तता करून प्रवेश मिळवले जातात हे अनेकांना माहीत आहे पण त्या बाबतीत कार्यवाही काहीच होत नाही. प्रवेश प्रक्रिया बदलणे गरजेचे आहे. भालचंद्र मुणगेकर, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे अशा विद्यार्थ्यांचा शोध शिक्षकांनी घ्यायला हवा व त्यांना शिक्षण प्रक्रियेत सामील हवां ते शिक्षण प्रक्रियेपासून दूर आहेत व जे पात्र आहेत त्यांना शिक्षण प्रक्रियेत स्थान नाही, हे थांबले पाहिजे. एका विषाणूने दोन वर्षे शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला पण माणसाने अनेकांचा शिक्षणाचा हक्क वर्षानुवर्षे हिरावून घेतला आहे. अशा स्थितीत सामान्य विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यायचे कसे? व आपला ठसा उमटवायचा कसा, याचाही विचार व्हायला हवा.

गुणवत्ता ही कोणाचीही मक्तेदारी नाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवून दिले तसेच अशा विद्यार्थ्यांचा शोध जर शिक्षण प्रक्रियेत घेतला गेला तर अनेक चांगली व्यक्तिमत्वे समाजात निश्चित निर्माण होतील. अशी निवड समाजपरिवर्तनासाठी निश्चित साहाय्य करेल पण आपण त्यांना शोधतच नाही ही आजची शोकांतिका आहे शिक्षण क्षेत्रात झुंडशाही बंद झाली तरच सामान्यांतून असामान्य पुढे येतील.

आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांच्या पाठपुराव्याला आले यश.

दै. जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे

उरण दि ९–उंची रोधकामुळे उरण–पनवेल या मुख्य मार्गावरील एसटीची प्रवासी बससेवा मागील तीन वर्षांपासून बंद आहे.या उंची रोधका मुळे प्रवाशांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. आता मात्र ही समस्या आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी केलेल्या प्रयत्ना मुळे सुटली आहे.हे उंची रोधक सोमवारी रात्री अखेर हटविण्यात आले आहेत. त्यामुळे बोकडवीरा, फुंडे, डोंगरी आणि पाणजे येथील हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. याबद्दल आनंदही व्यक्त केला जात आहे. मात्र हे उंचीरोधक हटविण्यात आल्याने मार्गावरील एसटी बससेवा पूर्ववत करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे. नवी मुंबई वाहतूक विभागाने उरण–पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडीपुलाच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले उंचीरोधक हटविण्याची मागणी पत्रव्यवहारा द्वारे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी प्रशासनाकडे केली होती. अखेरीस रात्रीच्या वेळी वाहतूक विभाग आणि सिडकोच्या माध्यमातून हे उंचीरोधक हटविण्यात आले आहेत. उंचीरोधकामुळे मागील तीन वर्षांपासून या मार्गावरील प्रवासी वाहतुकीचे एकमेव साधन असलेली एसटी बस सेवा बंद करण्यात आली आहे. सिडकोने उरण– पनवेल मार्गावर बसविण्यात आलेले बोकडवीरा आणि फुंडे हायस्कूलनजीकचे उंची रोधक हटविण्यात आले आहेत. विद्यमान आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी उंची रोधक हटवण्याची मागणी केली होती.सतत पाठपुरावा केला होता.

गौळ येथे श्रमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ अखंड हरिनाम संकीर्तन सोहळा.! ५ मे पासून तर १२ मे पर्यंत सप्ताहाचे आयोजन अनेक महाजाच्या किर्तनाची मेजवानी

देवळी (प्रतिनिधी) देवळी पासून पंधरा किलोमीटर वर असलेल्या श्रीक्षेत्र गौळ तथा पंचक्रोशीसह महाराष्ट्रातील दिव्यतेज तपोनिधी संत लोटांगण महाराज वारी परंपरेच्या वारकरी सांप्रदायाच्या भक्तीपंथावर अद्भूत अशी बावीस वर्षे वारी करणारे लोटांगण महाराज व त्यांच्या कृपाशिर्वादानेच चौपन्न वर्षे पर्यंत वारीची अखंड परंपरा चालविणारे निष्काम कर्मयोगी प्रेममुर्ती सद्गुरु बाबाराव खराबे महाराज यांच्या जन्म शताब्दी निमित्त गौळ येथे हंत बाबाराव खराबे महाराज संस्थानात श्रमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ अखंड हरिनाम संकीर्तन सोहळा ५ मे ते १२ मे पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या कार्यकाळात भागवत कथा आयोजित असुन श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते म्हणून अमरावती जिल्ह्यातील माजंरखेड येथील रमेश मानकर महाराज असतील. रोज दैनंदिन धार्मिक कार्यक्रमात पहाटे ४ते६ काकड आरती, सकाळी ६.३०ते ८.३० विष्णु सहस्त्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण ८.३० ते ११ श्रीमद् भागवत कथा, दुपारी ४ते ६ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ राञी दैनंदिन ७ते ९ हरि किर्तन आयोजित करण्यात आले आहे. या वेळेस ५ मे रोजी राञी ज्ञानेश्वर महाराज रोकडे ६ मे रोजी अनिल महाराज साखरे गायवाडी (दर्यापूर) ७ मे रोजी सोपान काका काळबांडे विदर्भ भूषण, आळंदी ८ मे रोजी संतोष महाराज भेंडेकर वाशिम ९ मे रोजी मुरलीधर महाराज बारगजे आळंदीकर १० मे रोजी गुरुवर्य देवदत्त महाराज आढाव श्रीराम मंदिर, कळंब ११ मे रोजी माधव महाराज काजळे किर्तन केसरी यांचे दैनंदिन राञी सात वाजता हरी किर्तन आयोजित आहे १२ मे २०२४ ला सकाळी ९ ते ११ रविंद्रजी महाराज विलायतकर सद्गुरु खराबे बाबांचे मानसपुत्र तथा



विद्यमान उत्तराधिकारी लोटांगण महाराज वारी परंपरा, यांचे काल्याचे किर्तन होणार असून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. संत खराबे महाराज संस्थानात बाबाराव महाराज खराबे यांची मुर्ती स्थापन झाल्या पासून त्यांची पुण्यतिथी सुरु करण्यात आली. त्यांचा पुण्यतिथी सोहळा व विद्यमान उत्तराधिकारी संतसेवक रविंद्रजी विलायतकर महाराज यांच्या सेवेला बारा वर्षे पूर्ण झाली म्हणून प्रथम तपपुर्ती सोहळ्या निमित्त श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम संकिर्तन सोहळा संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचा परिसरातील भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

युनिकॉन क्रिकेट क्लब कोरेगाव भिमा संघ राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत ठरला उपविजेता!

स्वरूप गिरमकर वाघोली / पुणे प्रतिनिधी (पुणे) वाघोली : पाचगणी येथे झालेल्या राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील युनिकॉन क्रिकेट क्लब कोरेगाव भिमा हा मुलांचा संघ उपविजेता ठरला.द स्पोर्ट्स फाउंडेशन ऑफ महाराष्ट्र यांच्या विद्यमाने पाचगणी येथील अंजुमन विद्यालयाच्या मैदानात चार दिवस ही स्पर्धा उत्साहात पार पडली.या स्पर्धेमध्ये चार संघांनी सहभाग नोंदविला होता.



ही स्पर्धा १२, १४, १६ या वयोगटात एकत्रित खेळवण्यात आली होती. यात युनिकॉन संघाच्या खेळाडूंनी अनेक वैयक्तिक बक्षिसे पटकावत ग्रामीण भागातुन येऊनही आपल्या गावचा वेगळा ठसा या स्पर्धेत उमटवला. या मध्ये बेस्ट बॉलरची ट्रॉफी राजवर्धन डफळ, बेस्ट विकेटकीपरची ट्रॉफी आदित्य ढेरंगे, बेस्ट फील्डर म्हणून आर्यन जगताप तर बेस्ट इमर्जिंग प्लेयर म्हणून लावण्या हिला गौरवण्यात आले. या स्पर्धेत एकमेव अर्धशतक ठोकणारा खेळाडूही युनिकॉर्न क्रिकेट क्लबचा रुद्र गव्हाणे हा होता. विजेत्या खेळाडूंना संघाचे प्रशिक्षक प्रताप फडतरे सर व ऋषीकेश गव्हाणे सर यांचे मार्गदर्शन लाभले.विजेत्या संघाचे कोरेगाव भिमाचे सरपंच विक्रम गव्हाणे, उपसरपंच सविताताई घावटे, मा. सरपंच अमोल गव्हाणे, मा. उपसरपंच दत्तात्रय ढेरंगे, गणेश कांबळे, प्रकाशबापू ढेरंगे,अरविंद गव्हाणे,सदस्य केशव फडतरे, अनिकेत गव्हाणे, गणेश फडतरे, शांताराम फडतरे उद्योजक सत्यनारायण ढेरंगे, विराज दाभाडे, संपत गव्हाणे यांनी अभिनंदन करुन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दैनिक सकाळचे प्रतिनिधी जगदीश जोगदंड यांचा वाढदिवस उत्साहात साजरा.

परभणी, अरविंद कांबळे



संत तुकाराम महाराज दूध डेरी पूर्णा येथे दैनिक सकाळचे प्रतिनिधी आदर्श पत्रकार, विद्यार्थी, चित्रकार, कलाकार ,लहान असो अथवा मोठा सर्वांना आपुलकीने वागणूक देणारे, भाषाप्रभू मार्गदर्शक, आमचे गुरु, अष्टपैलू प्रांजल व्यक्तिमत्व असणारे जगदीश जोगदंड यांचा जन्मदिवस पुष्पहार व टरबूज कापून आनंदात साजरा करते वेळेस संत तुकाराम महाराज दूध डेरी चे चेअरमन सुरेश नामदेव शिंदे तसेच पूर्णा तालुक्यातील दूध उत्पादक मंडळी मधुकर काळबांडे, चांदू वाघमारे दिगंबर शिंदे, भगुसेठ मुंदडा सोनी सेठ, संभाजी वैद्य गोपाळ कदम राजाराम वाडकर, शंकर वैद्य, नवनाथ भवरे ,चौगुले ,श्रीकांत शिंदे आदिनाथ काळबांडे आदिनाथ पडोळे ,प्रसाद शिंदे शेख कयूम, प्रसाद बनसोडे माऊली वैद्य हनुमान सोलव विठ्ठल भोरे, उमाकांत बनसोडे राजू इंगोले, बाबुराव बनसोडे आदींची उपस्थिती होती.

कातनेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेची विविध शालेय स्पर्धा परीक्षेतील यशाची उज्वल परंपरा कायम...



ओंकार श्रीरंगराव बेंडे सुप्रिया सतिश वैद्य

परभणी ,अरविंद कांबळे स्कॉलरशिप परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर झाला असून कातनेश्वर ता.पूर्णा येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेतही उत्कृष्ट कामगिरी बजावत विविध शालेय स्पर्धा परीक्षेतील शाळेच्या उत्तुंग यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.इ.५वी स्कॉलरशिप परीक्षा २०२४ मध्ये पात्र झालेले विद्यार्थी ओंकार श्रीरंगराव बेंडे सुप्रिया सतिश वैद्य सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा...!!

ऋषिकेश सकनुर यांना अक्षय्य हिंदू पुरस्कार जाहीर

परभणी, अरविंद कांबळे

हिंदूंनी हिंदूंसाठी केलेल्या कामासाठी हिंदू समाजाकडून कृतज्ञता म्हणून दिल्या जाणाऱ्या अक्षय्यहिंदूपुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे. निव्वळ लोकसहभागातून उभा राहिलेला अश्या स्वरूपाचा हा पहिलाच पुरस्कार आहे. दुसऱ्या अक्षय्यहिंदूपुरस्काराचे काल विजेते घोषित झाले आहेत. ह्यावर्षी अक्षय्य हिंदू पुरस्कार समितीकडे जवळजवळ दोनशे नामांकने प्राप्त झाली होती. महाराष्ट्र, गोवा, केरळ, छत्तीसगढ, पंजाब, दिल्ली, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, ओडिशा आणि कर्नाटक या विविध राज्यांतून सुमारे नामांकने आली होती. त्यात ऋषिकेश सकनुर यांच्या नावाची निवड काल पुरस्कार समिती करून करण्यात आली दुसरे अक्षय्यहिंदूपुरस्कार १९ मे २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजता,पुण्यात प्रख्यात विधिज्ञ आणि हिंदुंच्या न्याय्य हक्कांसाठी न्यायालयात अविरत लढा देणारे तरुण वकील श्री विष्णू जैन ह्यांच्या हस्ते दिले जातील. सदरील कार्यक्रमाच्या आयोजन पुण्यातील एसपी कॉलेजच्या लेडी रमाबाई सभागृहामध्ये करण्यात आले आहे. ह्या पुरस्कार सोहळ्या निमित्ताने पूर्ण देशभरात हिंदू कार्यकर्त्यांनी विविध क्षेत्रात केलेले काम समाजासमोर यावे म्हणून प्रामुख्याने गोरक्षा, धर्म जागरण, हिंदू एकता, आणि जातिभेद निर्मूलन, जनजाती जागरण आणि मीडिया ह्या सर्वच क्षेत्रात देशभरात अनेक लोक निःस्वार्थीपणे काम करत असतात , त्या कार्यकर्त्यांना प्रेरणा व कौतुकाची थाप मिळावी, अशी पुरस्कार आयोजन समितीची भूमिका असल्याचे पुरस्कार समितीच्या वतीने देखील स्पष्ट करण्यात आले. अक्षय्य हिंदू पुरस्कारासाठी विजेते निवडताना निवड समितीतर्फे तीन मुख्य मापदंड वापरले गेले; प्रामाणिकपणा, केलेले प्रयत्न आणि कामाचा जमीनीवरील प्रभाव. ऋषिकेश सकनुर गेल्या अनेक दिवस झाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून विविध हिंदुत्ववादी चळवळींमध्ये सहभागी आहेत, जातिभेद निर्मूलन,समतायुक्त समाज, यासाठी ते गेली पंधरा वर्ष झाले काम करतात, त्यात प्रामुख्याने संत चोखोबा ते तुकोबा 'एक वारी समतेची' मंगळवेढा ते देहू या समता वारीच्या आयोजनात त्यांची प्रमुख भूमिका राहिली आहे. तसेच काही दिवसापूर्वी गावातील अनुसूचित जातीच्या नागरिकांना मंदिर प्रवेश करवून घेण्यात देखील पुढाकार घेतला होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राच्या माध्यमातून देखील महाराष्ट्र राज्यामध्ये त्यांनी कामास सुरुवात केली आहे , अशा विविध कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार समितीच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे, काल संध्याकाळी अक्षय्य हिंदू पुरस्कार समितीच्या वतीने सदरील पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, ऋषिकेश सकनुर यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून स्वागत आणि कौतुक होत आहे, यावेळी त्यांना सामाजिक, राजकीय ,आर्थिक, औद्योगिक, क्षेत्रातील विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



दृष्टिकोण ..

जन्माने जाती धर्म
ओळखतोअकारण
कर्माने जात सिध्द
करत राही आपण
भग्वान महावीरांची
अद्भुत रे शिकवण
अरिहंतांचेज्ञानामृत
मनात करे साठवण
शरीर रुप बदलेलं
करताकेवळ मुंडण
समता विचार धारा
मानवा बनवे शर्मण
जात ना होते सिध्द
पूजा अर्चा न् तर्पण
सदाचार सद्वर्तनाने
आतमचर्येने ब्राह्मण
होत नसती मुनीवर
अरण्या राहून कोण
ज्ञान सर्वव्यापी घेई
बदलेल रे दृष्टिकोण
वल्कले घालून फक्त
ना येईल तपस्वीपण
षड्रिपु दुराचार मुक्त
अंगी रुजवा सद्गुण
****
–– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

२) सच्चा सेवक ..

मतदाना सम पावन
दुसरे काम ना बाकी
वेळआली हिशेबाची
चुकवा सगळी बाकी
आश्वासनांची मदिरा
सुसज्ज सर्वत्र साकी
असेकरु रे तसे करू
मिरवत राहती शेखी
जाहीरनामे प्रकाशित
जुन्याभांड्या लकाकी
नेते मंडळी सिद्धहस्त
कळेना कुणा चलाकी
साळसूदपणा मुलामा
चेह–यांउसनी तकाकी
मेक ओव्हर करायला
गर्दी उसळली एकाकी
शिळेअन्न बने स्वादिष्ट
चलाख तो स्वयंपाकी
फसून जाती सामान्य
गौडबंगाल करे तेराकी
जागृत रहा नागरिकां
पहा–या न येवो डुलकी
सजग हक्क अधिकार
काही न राहे शिल्लकी
मतदाना स्वेच्छेने जावे
ना घोडा गाडी पालखी
निवडावा सच्चा सेवक
राखा आपली मालकी
––––––––––
– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

ब्रह्माकुमारी सेवाकेंद्र भुसावळ तर्फे मुलासाठी समर कॅम्प सुरु






भुसावळ यावल रोडवरील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगणालगत असलेल्या प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरी विश्व विद्यालय च्या मार्फत दिं २ मे ते ६ मे २०२४ पर्यंत वयोगट ८ ते १४ वर्षाखालील मुलांसाठी विनामूल्य समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या समर कॅम्प मध्ये मुलांचे शारीरिक , मानसिक, बौद्धिक ,सामाजिक , सांस्कृतिक व आरोग्याच्या दृष्टीने संगीताच्या तालीवर व्यायाम कवायत विविध स्वरूपाचे चर्चासत्र गीत नृत्य नाटिका यांचे प्रशिक्षण सोबतच छोट्या छोट्या गोष्टीतून संस्कार मनोरंजनात्मक खेळ हे या समर कॅम्प मधून विद्यार्थ्यांना शिकवले जाणार आहे यासोबतच विद्यार्थ्यांचे मानसिक संतुलन स्थिर राहण्यासाठी व त्यांच्यातील चंचलता दूर होण्यासाठी ध्यानधारणा मेडिटेशनवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे . मुलाचे आरोग्य व संतुलित आहार या विषयी तज्ञ व्यक्तीच मार्गदर्शन राहणार आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण जागर प्रतिष्ठान व शैक्षिक आगाज चे नाना पाटील सर तर्फे विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व वृक्षारोपण कसे करावे कलम कसे लावावे याबाबतची जागृती करण्यात येणार आहे . तसेच सीड बॉल कसे तयार करावे याची प्रशिक्षण देण्यात येणार आहे .तरी पालकांना आवाहन करण्यात येत आहे. त्यांनी आपले मुलं मुली यांना समर कॅम्प साठी सेवाकेंद्र यावल रोड डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगणा शेजारी पाठवावे. समर कॅम्प ची वेळ सकाळी ९.३० ते १२ राहील असे सेवा केंद्राच्या प्रमुख संचालिका बीके सिंधू दीदी तसेच बीके ज्योती बहन व अन्य प्रशिक्षण बी के बहिर्णीनीही कळविले आहे. संस्कारक्षम असलेल्या विनामुल्य समर कॅम्प मध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन केले आहे. संपर्कासाठी ८०८७५७७५२० , ७०२८८८४८३० वर संपर्क करावा किंवा प्रत्यक्ष भेटावे .

जिंतूर शहरात शुल्लक कारणावरून ग्राहकाला हॉटेल मालकाने केली मारहाण.

परभणी ,अरविंद कांबळे



जिंतूर शहरातील शिवाजी चौक येथील सपना हॉटेल येथे सकाळी नऊ ते दहा वाजेच्या दरम्यान महाराष्ट्र सेक्युरिटी फॉर्सचा जवान शेख अजगर शेख चांद त्याला शुल्लक कारणावरून लाकडाने मारहाण करण्यात आली असता परिसरातील लोकांनी शेख अजगर शेख चांद याला ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत्यू घोषित केले.

याबाबत सविस्तर माहिती अशी मिळाली की शेख अजगर शेख खाजा हा नौकरी करिता मुंबई येथे जाण्यासाठी घरून मौजे केळी येथून दोन मे रोजी सायंकाळी अंदाजे पाच वाजता निघाला. त्यानंतर रात्री अंदाजे दहा वाजता अजगर यास त्याच्या वडिलांनी फोन केले असता त्याने मुंबई जाने रद्द झाले असे सांगितले असल्याची माहिती त्याचे भाऊ शेख अफसर यांनी दिली. आज तीन मे रोजी तो जिंतूर शहरात सकाळी वापस आला असता शिवाजी चौकात आव्हाड यांचे सपना हॉटेलवर अंदाजे नऊ वाजता नाश्ता करण्यासाठी गेला असता शुल्लक कारणावरून त्याला लाकडाने मारहाण झाल्याने नाका तोंडातून रक्तस्त्राव होत असल्याचे पाहत नागरिकांनी ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे दाखल केले असता ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी त्याला मृत्यू घोषित केले. यावरून शेख अजगर यांचे भाऊ शेख अफसर शेख खाजा वय २४ वर्षे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हॉटेल मालक शेषराव लक्ष्मणराव आव्हाड, त्यांचा मुलगा अमोल शेषराव आव्हाड, हॉटेलवर काम करणारे बालाजी पांडुरंग रणखांबे, इमरान बन्याभाई कुरेशी या सर्वांवर कलम ३०२ नुसार गुन्हा दाखल केला गेला व आरोपींना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती परभणी पोलीस अधीक्षक रवींद्र सिंह परदेशी यांनी दिली. पाहूया त्यांची

कातनेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

परभणी, अरविंद कांबळे



कातनेश्वर ता.पुर्णा येथील जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्र दिनाच्या पुर्वसंध्येला वार्षिक स्नेहसंमेलन 'अविष्कार २०२४' मोठ्या उत्साहात संपन्न झाले.चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शाळेतील निवडक गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला .कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते,लोकगीते,बालगीते,वेशभूषा ,नाटक अशा विविध प्रकारात आपली कला सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक आनंदाचा क्षण असतो या माध्यमातून चिमूल्यांच्या नृत्याविष्काराला भारावून प्रेक्षकांनी भरभरून दाद देत कौतुक केले.यावेळी कातनेश्वर येथील विविध क्षेत्रातील मान्यवर,पालक,माता पालक,महिला मंडळी,शिक्षणप्रेमी नागरिक,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या आयोजनासाठी ग्रामपंचायत व शाळा व्यव्यस्थापन समिती यांचे मोलाचे सहकार्य लाभले.यावेळी कातनेश्वरचे सरपंच प्रदीप चापके,उपसरपंच रामेश्वर चापके,ग्रामपंचायत सदस्य बापूराव चापके,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीकांत चापके,उपाध्यक्ष गजानन चापके,सदस्य जितेंद्र पुंडगे,पोलीस पाटील ज्ञानोबा काटकर,शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर सोनाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दामोधर आव्हाड,पतींगराव खोकले,संजय खडाळकर,नागनाथ पांचाळ,बाळासाहेब मोरे,प्रविण चापके,राजु पांचाळ,भाग्यश्री अंबटवार,राधिका गुडेवार,उद्धव चापके,गोविंद चापके यांनी परिश्रम घेतले.

लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहाच्या वातावरणात पार पडले

हिंगोली / रुपेश एंगडे





वसमत शहराच्या जवळ जयनगर या भागात कमी कालावधीमध्ये लालबहादूर शास्त्री विद्यालय नावाची शाळा नाव रूपाला आली आहे तेथील शिक्षकांच्या अथक परिश्रमाने व आगळ्या वेगळ्या शिक्षण प्रणालीतून या शाळेने शिक्षणाचा एक उच्चांक प्राप्त केला आहे. येथील शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्येशिक्षणाविषयी प्रेम, अभ्यास करण्याची सवय, त्यांच्यामधील कला गुण हे नव्याने बहरत आहेत. यामध्ये तीळ मात्र शंका नाही यामुळेच की काय पालकांमध्ये आपल्या मुलांना या शाळेत पाठवण्यासाठी उत्साह पहायला मिळत आहे.

शाळेची दुसरी बाजू म्हणजे विद्यार्थ्यांची बालवयापासून नियमित शिक्षणा वितीरिक्त विविध विषयाच्या स्पर्धा परीक्षा घेऊन त्यांना स्पर्धा परीक्षांची गोडी निर्माण केली जाते तसे पाहिले तर लाल बहादूर शास्त्री विद्यालय ही एक इंग्रजी माध्यम शाळा व सेमी माध्यम शाळा असून विनाअनुदानित प्रायव्हेट तत्त्वावर चालणारी शाळा आहे. या शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या आवडी निवडी जपत त्यांचा सर्वांगीन विकास करण्याचा प्रयत्न केला जातो.

या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन हे दरवर्षीप्रमाणे यावर्षी इंग्रजी माध्यम मधील विद्यार्थ्यांचे दिनांक २९ एप्रिल २०२४ या दिवशी तर सेमी माध्यम मधिल विद्यार्थ्यांचे दिनांक ०१ मे २०२४ रोज बुधवारी या दिवशी लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या प्रांगणामध्ये झंकार या कार्यक्रमात विविध गाण्यावर सुंदर नृत्य सादर करत पालकांची मने जिंकली तर सांस्कृतिक कार्यक्रम सुरवात होण्यापूर्वी विविध स्पर्धेतून उच्च गुण प्राप्त विद्यार्थ्यांचा व स्कॉलरशिप परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार करण्यात आला आहे. हे दोन दिवशीय स्नेह सम्मेलन मोठया उत्साहात संपन्न झाले आहे.

श्री गणेश मिल्ट्री फांऊडेशन येथे जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिन साजरा

हिंगोली / रुपेश एंगडे



वसमत तालुक्यातील टोकाई कारखाना परिसरातील गिरगाव रोड वरिल श्री गणेश मिल्ट्री फाउंडेशन मध्ये महाराष्ट्र दिना निमित्त ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे आयोजन संस्था अध्यक्ष श्री कृष्णा बागल यांनी केले होते. झेंडावंदन श्री संतोष नांगरे (कराटे प्रशिक्षक) सचिव हिंगोली जिल्हा स्पोर्टस कराटे डो असोशिएशन यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून, डॉ.माने, बजरंग लांडगे , श्री मगर सर ,माने मॅडम, लांडगे मॅडम, अँड. वैभव जाधव , कुंडलिक शिंदे , रेखा मॅडम, व संस्थेच्या संचालिका प्रा. सुजाता बागल मॅडम उपस्थित होत्या.

कृष्णा बागल यांच्या मार्गदर्शना खाली श्री गणेश मिल्ट्री फाऊंडेशन येथे शालेय मुलांच्या सर्वांगीन विकासा करिता आयोजीत उन्हाळी प्रशिक्षण शिबीरात सहभागी खेळाडुंची उपस्थिती होती. सध्याच्या आधुनीक युगात मुलं मुले मोबाईल च्या अतिरेकी वापरामूळे मनोरूग्ण होत असुन मैदानी खेळा पासुन अलिप्त होत आहेत. त्यांचा बौध्दीक व शारीरीक विकास होउन देशाचे भावी आधारस्तंभ बलवान व तंदुरुस्त व्हावेत या करिता समर कॅम्प मधे योगा, कराटे , हार्स रायडींग , रनिंग, नेमबाजी , विविध मैदानी खेळे , ट्रेकिंग यांच्या सह शिस्त , संयम , आत्मविश्वास , नैतिक मुल्यांचे मार्गदर्शन देण्यात येत आहे असे संस्थाअध्यक्ष कृष्णा बागल यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्र संचलन श्री मगर यांनी तर आभार सुजाता बागल मॅडम यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त भव्यदिव्य भिम गितांचा कार्यक्रम संपन्न

हिंगोली / रुपेश एंगडे





जिल्ह्यातील वसमत तालुक्याच्या ठिकाणी शांतिदूत जयंती मंडळ समितीच्या वतीने महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक अनिरुद्ध वनकर यांचा बुद्ध आणि भीम गीतांच्या प्रबोधननात्मक कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या थाटात केले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख्याने बौद्ध धम्म गुरू भंदत पय्याबोधी थेरो उपस्थित राहुन सर्व धम्म बांधवाना धम्मदेशना दिली तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन वसमत विधानसभेचे आमदार राजु नवघरे हे प्रामुख्याने उपस्थित राहुन जनतेला संबोधीत केले आहे

तसेच कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून सिद्धार्थ हत्तीआंबिरे, लोकनेते विजय वाकोडे, सुरेशदादा गायकवाड, अनिताताई हिंगोले, अब्दुल हाफिज अब्दुल रहमान, प्रा.रमेश मानवते, गौतम दवणे, अँड तेलगोटे, डॉ कुंटे, संरपच राजु एंगडे, बालाजी मस्के,यांच्यासह शेकडो मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन शांतीदूत सार्वजनिक जयंती समीतीचे कार्यध्यक्ष तथा माजी नगरसेवक राजकुमार एंगडे यांनी केले होते. जंयतीच्या निमिताने हि भिम गिंताची परंपरा २८ वर्षापासून शांतीदूत सार्वजनिक जंयती मंडळ यांच्या वतीने राबवण्यात येत असते. सदरचा कार्यक्रम पाहण्यासाठी वसमत तालुक्यासह जिल्ह्यातुन हजारो महिला व नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयकुमार एंगडे यांनी केले तर आबेंडकर चळवळीतील कार्यकर्त्यानी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खुप परिश्रम घेतले आहे.

कर्मविर भाऊराव पाटील यांच्या ६५ व्या पुण्यतीथी निमित्त महेंद्र घरत यांचे अभिवादन!



दै. जनप्रभात उरण तालुका प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे

उरण दि ९–सामुहीक शिक्षणाचे पुरस्कर्ते, शिक्षणतज्ञ, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक,कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज ६५ वी पुण्यतिथी. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून समता व बंधूता यांचे संस्कार समाजाला दिले. आपल्या ताटातील अर्धी भाकरी समोरच्याला देण्याची शिकवण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिली. कर्मवीरांच्या विचारांना आदर्श मानणारे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग बॉडी कौन्सील मेंबर तथा रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष, कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सातारा येथील समाधीस्थळी दर्शन घेऊन अभिवादन केले.

सिंदी पोलिसांनी लावला अवघ्या २४ तासात चोरीचा छडा



समुद्रपूर समुद्रपुर: मौजा नारायणपूर शिवारातील शेतातून मोटारपंप चोरून नेल्याची तक्रार सिंदी पोलिसात नोंद झाली. याप्रकरणी पोलिसांनी तपासाला गती देत अवघ्या २४ तासात दोन आरोपींना मुद्देमालासह अटक करून बेड्या ठोकल्या. गणेश बंडू भोयर (३०) राहणार कळमना तालुका समुद्रपूर जिल्हा वर्धा व शंकर दिवाकर मुडे (२७) राहणार मारडा तालुका समुद्रपूर जिल्हा वर्धा अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

याबाबत सिंदी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकरी सुनील राजेंद्र अवचट राहणार कांढळी यांची मौजा नारायणपूर येथे शेती असून त्यांच्या विहिरीतून शनिवार दिनांक ४ मे रोजी कोणीतरी अज्ञात आरोपींनी त्यांच्या विहिरीतील ओलितासाठी लावलेली ५ एच. पीची मोटरपंप चोरून नेला. याप्रकरणी अवचट यांनी सिंदी पोलिसात तक्रार दाखल केली. त्यामुळे तक्रारीच्या आधारे सिंदी पोलिसांनी तपासाला गती देत मुखबिरकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी गणेश बंडू भोयर व शंकर दिवाकर मुडे या दोन आरोपीला अटक करून पोलिसी हिसका दाखवताच चोरी केलेली मोटारपंप सिंदी शहरातील भंगार विक्रेता शहेजाद हबीब शेख याला विकल्याची कबुली दिली. त्यामुळे भंगार विक्रेता शेख यांच्या दुकानातून ५ एच.पीची १० हजार ५०० रुपये किमतीची तसेच गुन्ह्यात वापरलेली एम.एच.ए.ए–१९४५ क्रमांकाची होरो स्पेडर कंपनीची दुचाकी किंमत ४० हजार रुपये असा एकूण ५० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल दोन्ही आरोपींच्या ताब्यातून हस्तगत केला.

याप्रकरणी पोलिसांनी चोरीतील दोन्ही आरोपींना अटक केली असून आरोपींविरुद्ध कलम ३७९, ४११, ३४ नुसार सिंदी पोलिसात गुन्ह्याची नोंद केली. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नुरूल हसन, अप्पर पोलीस अधिक्षक डॉ. सागर कुमार कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांचे मागदर्शनात ठाणेदार देवेंद्र ठाकुर, पोलीस उपनिरीक्षक श्यामसुंदर सुर्यवंशी, पोलीस हवालदार आंनद भस्मे, रवि मोरे, कांचन चाफले, उमेश खामनकार, शिवाणी निकम व सर्व नेमणुक पो.स्टे. सिंदी (रेल्वे) यांनी केली.

चार वाहने भरतीच्या पाण्याखाली

दै.जनप्रभात प्रशांत पोवार
राजापूर प्रतिनिधी



राजापूर शहरातील अर्जुना व कोदवली नदीतील गाळ उपशामुळे नदीपात्र खोल झाले असून भरतीचे पाणी नन्हेसाहेब पुलापर्यंत येत असल्याने खर्ली नदीपात्रात उभ्या करण्यात येणाऱ्या गाड्या पाण्याखाली जाण्याचे पकार घडत आहेत. बुधवा री अशापकारे तीन ते चार वाहने भरतीच्या पाण्याखाली गेली होती. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून राजापूर नगरपरिषद, महसुल विभाग यांच्या सहकार्याने आणि लोकसहभागातून शहरातील अर्जुना आणि कोदवली नद्यांमधील गाळ उपसण्यात आला आहे. गाळ उपसल्याने ही दोन्ही नदीपात्रे खोल झाली आहेत. त्यामुळे पूर्वी उन्हाळी हंगामात वैशंपायन गुरूजी पुलापर्यंत येणारे भरतीचे पाणी आता थेट नन्हेसाहेब पुलापर्यंत येत आहे. उन्हाळी हंगामात कोदवली नदीपात्र कोरडे पडत असल्याने या खर्ली नदीपात्रात वाहने पार्प करण्यात येतात. पूर्वी या ठिकाणी भरतीचे पाणी येत नसल्याने दिवसरात्र वाहने उभी करून ठेवण्यात येत होती. मात्र आता गाळ उपशामुळे भरतीचे पाणी नन्हेसाहेब पुलापर्यंत येत असल्याने खर्ली पात्रात उभी करण्यात येणारी वाहने पाण्याखाली जात आहे. बाहेरून येणाऱ्या वाहन चालकांना भरतीच्या पाण्याचा अंदाज नसल्याने ते बिनधास्तपणे वाहने पार्प करून जातात. मात्र भरतीच्या पाण्याखाली निम्मी चारचाकी बुडत असल्याने वाहनांचे मोठे नुकसान होत आहे. बुधवारी तर तीन ते चार वाहने पाण्यात बुडाल्याचे पहायला मिळाले. त्यामुळे नगर परिषद पशासनाने या ठिकाणी वाहन चालकांना सूचना देणारे फलक लावावेत, अशी मागणी होत आहे.

रेल्वे प्रशासना तर्फे ४९० अनधिकृत फेरीवाले आणि २१ प्रवाशांच्या सामानाची चोरी करणाऱ्या गुन्हेगारा ना अटक.



परभणी ,अरविंद कांबळे

पूर्णा,–अनधिकृत फेरीवाले आणि रेल्वे मध्ये प्रवाश्यांच्या सामानाची चोरी करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यासाठी विशेष टीमची नियुक्ती श्री अमित कुमार मिश्रा, विभागीय सुरक्षा आयुक्त, रेल्वे प्रोटेक्शन फोर्स, नांदेड यांच्या देखरेखीखाली अनधिकृत फेरीवाले आणि रेल्वे मध्ये प्रवाश्यांच्या सामानाची चोरी करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यासाठी विशेष टीमची नियुक्ती करण्यात आली आहे. जानेवारी –२०२४ पासून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमे अंतर्गत कार्यवाही करून जानेवारी ते एप्रिल –२०२४ पर्यंत एकूण ४९० प्रकरणे रेल्वे ॲक्ट १४४ अंतर्गत नोंदवण्यात आली आहेत.गेल्या महिन्यात म्हणजे एप्रिल–२०२४ मध्ये १७१ प्रकरणे रेल्वे ॲक्ट १४४ नोंदवण्यात आली आहेत. या मोहिमेदरम्यान, विशेष पथकाने जानेवारी–२०२४ ते एप्रिल–२०२४ पर्यंत ४९० अनधिकृत फेरीवाले आणि २१ प्रवाशांच्या सामानाची चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना अटक केली आहे. ही मोहीम या पुढेही सुरूच राहणार आहे.

नांदेड पूर्णा परभणी रेल्वे स्थानकावरील अवैध हक्कर्स बंद करण्याची निवेदनाद्वारे मागणी.

परभणी अरविंद कांबळे

पूर्णा मागील काय महिन्यापासून नांदेड, पूर्णा परभणी ,रेल्वे स्थानकावर व रेल्वे गाडीत अवैध हक्कर्स वाढल्यामुळे ते तात्काळ बंद करण्यात यावे अशी मागणी रेल्वे सुरक्षा बलाचे पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. रेल्वे स्थानकावर अवैध खाद्यपदार्थ खाद्यपदार्थावर कुठल्याही कंपनीचे नाव कस्टमर केअर चे नंबर याची कुठलीही माहिती नाही असे रिंग कुरकुरे पॉपकॉर्न खाद्यपदार्थ रेल्वे तसेच विमल गुटखा, चिक्की स्थानकावर व रेल्वे गाडीत अवैध विकले जात आहेत तसेच रेल्वे विभागाकडून परवानगी न दिलेल्या लोकल पाणी बॉटल रेल्वे प्रशासनातून पाणी बाटल ची किंमत पंधरा रुपये आहे परंतु अवैध हाकार्स पाणी बॉटल वीस रुपयात सरास विकत असून प्रवाशाची मोठी लूट करत आहेत. रेल्वे स्थानकावर पाणी बॉटल ची किंमत पंधरा रुपये आहे. प्रवाशांनी फक्त पंधरा रुपये देऊनच पाणी बॉटल खरेदी करावी. अशी अलाउसमेंट रेल्वे स्टेशनवर करत होते. काही महिन्यापासून रेल्वे प्रशासनाकडून ही अलाउसमेंट ही बंद करण्यात आलेली आहे. त्याचा फायदा अवैध हक्कर्स पाणी बॉटल सरास वीस रुपयांनी विकत आहेत . प्रवाशांची मोठी लूट करत आहेत. असे निवेदनकर्त्यांनी बोलताना सांगितले आहे . पूर्णा, परभणी, नांदेड रेल्वे स्थानकावर अवैध हक्कस वाढल्यामुळे रेल्वे प्रवास करणाऱ्या व तसेच रेल गाडी चढता उतरता प्रवाशांना मात्र याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून यात अनेक प्रवाशांचे मोबाईल महिलांचे पर्स दाग दागिने पाकीट मार अशा घटना रेल्वे प्लॅटफॉर्म वर व रेल्वे गाडीत चोरीच्या घटना घडत आहेत प्रवाशांमध्ये व महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. रेल्वे सुरक्षा बलवर लोहमार्ग पोलीस याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत पोलीस महानिरीक्षक यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊनअवैध हाकर्स बंद करण्यात यावे असे निवेदन रेल्वे सुरक्षा बल तसेच महानिरीक्षक निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी अरविंद कांबळे, विजय सोनुले, मोहम्मद शमी, जाकिर पठाण, सुशील गायकवाड, सय्यद सलीम, आदींच्या निवेदनावर साक्षर्य आहेत

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जयंती महोत्सव समीती अध्यक्ष संतोष होळकर, उपाध्यक्ष पदी नाना नरवटे तर सचिव पदी भरत पोले यांची निवड

दैनिक जन प्रभात उपसंपादक
लातूर जिल्हा
विष्णु मोहन पोले



लातूर/अहमदपूर: दि ०९/०५/२०२४ रोज गुरुवार रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समाज मंदिर राजुर (अहमदपुर) जिल्हा लातुर येथे बैठक संपन्न झाली त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पांडुरंग लोकरे तर प्रमुख उपस्थीती राम भाऊ नरवटे.अनंत होळकर.दिनकर बडुरे. प्रदिप भाऊ खोमणे. मानिक नरवटे. अनंत देवकत्ते . संग्राम नरवटे.याच्या प्रमुख उपस्थीती कार्यकारिणी जाहीर करण्यात आली ती खालील प्रमाणे जयंती समीती अध्यक्ष संतोष होळकर उपाध्यक्ष:– नाना नरवटे कार्याध्यक्ष:– आप्पर होळकर सचिव:– भारत पोले कोषाध्यक्ष:– संदिप पाटील मिरवणुक प्रमुख:– तुकाराम लोकरे.राम भिंगे. यांची निवड करण्यात आली त्या प्रसंगी . किरण बारमाळे.राजु नरवटे.बळीराम पोले.शरद चव्हाण.गणेश नरवटे. खंडेराव कोपनर.ज्ञामदेव सुरणर.. तळशिदास देवकत्ते. अँड सोमनाथ फुले.ज्ञाणेश्वर बनसोडे.नितिन काळे. गणेश लोकरे.शिवा कोलमवार.तसेच आणेक अहील्या प्रेमी उपस्थित होते.

वाको वर्धा किक बॉक्सिंग टीम राज्यस्तरीय स्पर्धे करिता रवाना



वर्धा जिल्हा येथील वाको वर्धा किकबॉक्सिंग असोसिएशन च्या विद्यार्थ्यां अहमदनगर येथे आयोजित ऑल महाराष्ट्र स्टेट चिलद्रन ,कॅडेट अँड ज्युनिअर किक बॉक्सिंग चॅम्पियनशीप २०२४ करिता आज रवाना झाले. यात वर्धा जिल्ह्यातील २३ खेळाडु, ३ रेफरी व ३ कोच असे एकूण २९ लोकांची टीम अहमदनगर (अहिल्यानगर) येथे आज वर्धा रेल्वे स्टेशन वरून महाराष्ट्र एक्सप्रेस नि रवाना झाली आहे ही राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक ३ मे ते ५ मे २०२४ ला वाडिया पार्क , बॅडमिंटन हॉल अहमदनगर येथे वाको इंडिया महाराष्ट्र चे अध्यक्ष निलेश शिवाजी शेलार यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धे करिता महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यातील खेळाडूंनी ऑनलाईन प्रवेश नोंदविला आहे, पुढे आयोजित राष्ट्रीय स्पर्धे करिता या राज्यस्तरीय स्पर्धेतून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. वाको वर्धा किकबॉक्सिंग ची टीम वाको इंडिया महाराष्ट्रचे उपाध्यक्ष कृष्णा ढोबळे (आंतरराष्ट्रीय रेफरी) वाको वर्धा अध्यक्ष गोपाल कोटेवार वाको वर्धा उपाध्यक्ष अभिजित पारगावकर यांच्या मार्गदर्शनात वर्धा जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे. तसेच या राज्यस्तरीय स्पर्धेत महिला रेफरी काजल डोंगरे, वैष्णवी लढी तसेच रेफरी साहिल तराळे हे वर्धा जिल्हा कडून पंचाचे कार्य करणार आहे. सर्व खेळाडूंना स्पर्धेच्या विजया करिता वाको किक बॉक्सिंग असोसिएशन वर्धा च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पालकांनी तसेच खेळाडूंनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

नवनियुक्त शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोपीय सोहळा उत्साहात संपन्न.

नागपूर, दिलीप येवले–



नागपूर जिल्हा परिषदेसाठी निवड झालेल्या ३४५ नवनियुक्त शिक्षकांचा, प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, नागपूर या ठिकाणी मागील महिन्याभरापासून सुरू होता.

आज दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रमाचा समारोपीय सोहळा सरस्वती विद्यालयाच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या हर्षलता बुराडे, प्राथमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी माननीय श्री निखिल भुयार सर, सरस्वती विद्यालयाच्या प्राचार्य पुष्पा अनंत नारायण आदी मान्यवर उपस्थित होते.

आपली भूमिका शिक्षकाची नाही तर सुलभकाची आहे, आणि शिक्षक प्रशिक्षण हा शिक्षण प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे,नवनियुक्त शिक्षक जिल्ह्यातल्या शिक्षणाचा दर्जा नक्कीच उंचावतील असा आशावाद जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या हर्षलता बुराडे मॅम यांनी आपल्या मनोगत आतून व्यक्त केला.

नवतरुण शिक्षकांच्या अंगी असलेला उत्साह हा नक्कीच जिल्ह्याच्या शिक्षण क्षेत्रातली उंची वाढवणारा असेल, व सर्वजण सोबतीने अज्ञानाच्या शत्रूला हरवून ज्ञानाचा दिव्य प्रकाश पसरवू असे प्रतिपादन सौम्या शर्मा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.

उपशिक्षणाधिकारी निखिल भुयार यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तर देत, नवनियुक्त शिक्षकांच्या पुढील कार्यवाहीची दिशा समजावून सांगितली. पुष्पा अनंत नारायण मॅम यांनी शिक्षकाची समाजातील भूमिका आपल्या मनोगतातुन स्पष्ट केली. सदर शिक्षण प्रशिक्षण हे आमच्या आयुष्याला कलाटणी देणारे व शिक्षण क्षेत्राबद्दल यथायोग्य मार्गदर्शन करणारे होते असे भाव अनेक प्रशिक्षणार्थींनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

सदर समारोपीय कार्यक्रमांमध्ये जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेतील सर्व प्राध्यापकांचा तसेच गेल्या महिन्याभरापासून प्रशिक्षण देत असलेल्या सर्व साधन व्यक्तींचा, प्रमाणपत्र व पुस्तक रुपी भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. साधन व्यक्तींच्या वतीने आ. प्रा. गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नवनियुक्त शिक्षकांना प्रतिनिधिक स्वरूपात प्रशिक्षण कार्यक्रम पूर्तीचे प्रमाणपत्र ही प्रदान करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व नवनियुक्त शिक्षकांना विनोबा पचे प्रशिक्षण देण्यात आले.

संपूर्ण राज्यभरात नागपूर हा एकमेव असा जिल्हा ठरला की ज्यामध्ये नवनियुक्त शिक्षकांना परिपूर्ण असे ३० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. व जिल्ह्यातील स्थितीचा आढावा लक्षात घेऊन नवनियुक्त शिक्षकांची तयारी करून घेण्यात आली. नागपूर जिल्हा परिषदेचा सदरचा उपक्रम हा संपूर्ण राज्यभरासाठीही मार्गदर्शक ठरला. व सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे सर्वांकडूनच कौतुक करण्यात आले.प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी आदरणीय सिद्धेश्वर काळुसे सर तसेच माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी रोहिणी कुंभार यांच्याही शुभेच्छा सदर समारोपीय सोहळ्याला प्राप्त झाल्या.

सदर कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन हे प्रशिक्षण घेतलेल्या नवनियुक्त शिक्षकांमार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन पाटील, माधुरी झडे, विक्रम आकरे, रोमा शहा, उज्वला घुगे व संदीप यादव यांनी केले तर आभार प्रदर्शन खुशबू मसराम यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा शिक्षक प्रशिक्षण संस्थेतील सर्व प्राध्यापकांचे, साधन व्यक्ती, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व नवनियुक्त शिक्षक बंधू–भगिनींचे सहकार्य लाभले.

जामगाव येथील प्रवासी निवारा प्रवाशांचा जीव घेणार का? जामगाव येथील नागरिकांचा प्रश्न



साहुर शरद वरकड

आष्टी तालुक्यातील जामगाव याठिकाणी असलेला प्रवासी निवारा प्रवाशांचा जीव घेणार का? अशा प्रकारचा प्रश्न जामगाव येथील नागरिक करीत आहे येथील प्रवासी निवारा पुर्णपणे खराब झाला असून सिमेंटचे भाग खाली पडत आहे व त्यातील लोहा सुध्दा बाहेर निघाला आहे त्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे उन्हात व पावसात नागरिक प्रवासी निवारा चा सहारा घेतात परंतु नागरिकांच्या जीवाला धोका असल्याने उन्हात व पावसात प्रवासी खुल्या जागेवर उभे असतात या समस्येकडे मात्र संबंधित अधिकारी लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप येथील नागरिक करीत आहे तीन वर्षांपासून हा प्रवासी निवारा खराब झाला असून याची आजपर्यंत कुठल्याही प्रकारची दुरूस्ती सुध्दा करण्यात आली नाही या भागातील लोकप्रतिनिधी कुंभकर्ण अवस्थेत असल्याने जोपर्यंत जाग येणार नाही तोपर्यंत प्रवासी निवाराचे काम होणार नसल्याची चर्चा नागरिक करीत असल्याचे दिसून आले हे विशेष

गेल्या दोन वर्षांपासून प्रवासी निवाराचे भाग खाली पडत आहे त्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे परंतु याकडे मात्र कोणाचेही लक्ष नाही यामध्ये जर जीवित हाणी झाली तर याला जबाबदार संबंधित विभाग राहील लवकरात लवकर नविन प्रवासी निवारा बांधून प्रवाशांची सोय करावी
वसंतराव मोगरे जामगाव

विद्युत पुरवठा सुरु होण्याआधीच खांब जमीनदोस्त

: गावठाण विद्युत जोडणी कामाचा निकृष्ट दर्जा पहिल्याच वादळात ५ खांब वाकले

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपूर

समुद्रपूरः– तालुक्यातील गिरड – आर्वी रस्त्यावर परीसरातील गावांना २४ तास थ्री फेज विद्युत पुरवठा देण्यासाठी गावठाण फिटर योजना अंमलात आणली असून या योजनेच्या माध्यमातून आर्वी, फरीदपुर,मोहगांव,तावी या गावांमध्ये पोल उभे करून यावर तारा जोडण्यात आल्या. आता येत्या काही दिवसांमध्ये इलेक्ट्रॉनिक पुरवठा सुरू करणारच तर गुरुवारी १२ वाजता परीसरात झालेल्या वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाने आर्वी गावाजवळ ३ पोल जमिनीवर कोसळले तर दोन पोल वाकले यावेळी अचानक कोसळलेल्या पोलामुळे काही दुचाकीस्वार किरकोळ जखमी झाले.मात्र पहिल्याच अवकाळी पावसाने असे पोल कोसळल्याने याठिकाणी काम करणाऱ्या ठेकेदारावर प्रश्न चिन्ह निर्माण झाला असून



जर आताच हे पोल जमिनीवर कोसळले तर भविष्यात काय होणार असा प्रश्न नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे .तसेच भीतीचे वातावरण सुध्दा पसरले आहे.या कामाची चौकशी करून काम योग्य रीतीने करून द्यावे अशी मागणी मोहगांव ग्रामपंचायतीचे सरपंच विलास नवघरे यांनी संबंधित विभागाकडे केली आहे. सरपंच विलास नवघरे गावांना २४ तास थ्री फेज इलेक्ट्रॉनिक पुरवठा मिळावा यासाठी शासनाकडून गावठाण फिटर योजना अंमलात आणली आहे.मात्र ३ महिन्या आधी उभे केले.पहिल्याच वादळात हे रस्त्यावरील पोल जमिनीवर कोसळले सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.मात्र हे हि लाईन गावातून गेली आहे जर गावातील पोल कोसळले तर मोठी दुर्घटना होऊ शकते.यामुळे या कामाची चौकशी करून काम योग्य करावे जेणेकरून पुन्हा असा प्रकार घडणार आहे.

महागाव येथे विज पडून बैल ठार: शेतकऱ्याचे ५० हजार रुपयांचे नुकसान

तालुका प्रतिनिधी अमोल झाडे समुद्रपूर



समुद्रपुर: तालुक्यात अचानक मेघगर्जनेसह विजेच्या कळकळासह झालेल्या वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाने चांगलेच थैमान घातले असून १२ वाजताच्या सुमारास महागाव येथील शेतकरी गजानन बोंबले यांच्या गावा शेजारी असलेल्या गोठ्याच्या समोर बांधून असलेल्या बैलावर विज पडून बैल जागीच ठार झाले.गुरुवारी १२ वाजताच्या सुमारास समुद्रपुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये वादळीवारा व मेघगर्जनेसह विजेच्या कळकळासह अवकाळी पावसाला सुरुवात झाली अनेक ठिकाणी जवळपास एक ते दिड तास कोसळल्या या पावसाने नागरिकांची एकच तारांबळ उडाली असून या पावसात शेतकऱ्यांच्या शेतामध्ये साठवून असलेली जनावरांची वैरण ओली झाली.अनेक ठिकाणी विजेचे खांब वाकले.तर महागाव येथिल शेतकरी गजानन बोंबले यांचा बैल विज पडून ठार झाला असून शेतकऱ्याचे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे.



दि.०९.०५.२०२४ रोजी सकाळी ७ सुमारास ते आर्वी परिसरात... ५८,००० माल दुचाकी सह दारू साठा केला जप्त आज रोजी मुखवीर कडून अशी माहिती मिळाली की पाचोड वरून बेडोना येथे दुचाकीने बेडोना राहणारा ज्ञानेश्वर मरस्कोल्हे पाचोड वरून गावठी दारूची वाहतूक करणार आहे माहिती प्राप्त झाल्याने पोलीस व पंच पाचोड ते बेडोना रोडवर नाकाबंदी सदर आरोपीस ताब्यात घेतले गाडीच्या टंकी वर एक रबरी टूब मध्ये ४० लिटर गावठी मोहा दारू ८००० रु ची मिळून आली व दुचाकी असा ५८,००० चा माल पंच्यासमक्ष जप्त केला...आरोपी ज्ञानेश्वर मरसकोल्हे रा.बेडोना याच्यावर पोस्ट आर्वी येथे गुन्हा दाखल केला . मा.पोलीस अधीक्षक नरूल हसन,अप्पर पोलीस अधीक्षक सागर कवडे,उप विभागीय पोलीस अधिकारी डी.सी खंडेराव यांचे मार्गदर्शनात सदरची कारवाई उप विभागीय आर्वी पथकातील अधिकारी हर्षल नगरकर, अंमलदार सतीश जांभुळकर, सुरज मेंढे, यांनी केली.

जाम चौरस्त्यावरील पेट्रोलपंपावर ट्रकच्या चाकातील गिट्टी काढत असलेला वाहक मागच्या चाकात दबून जागीच ठार

तालुका प्रतिनिधी
अमोल झाडे समुद्रपूर



समुद्रपुर :– तालुक्यातील जाम चौरस्त्यावरील पेट्रोलपंप जवळ ट्रकच्या मागच्या चाकात दबून क्लिनर जागीच ठार झाला आहे. प्राप्त माहितीनुसार शनिवारी रात्री १२ वाजताच्या सुमारास ट्रक क्रमांक यु.पी ७० डि. टी ८४९५ हा पेट्रोलपंपावर गर्दी असल्याने उभा होता.चालक मोहम्मद याशीम मोहमद वय ५५ वर्ष यांनी वाहक शिववंदन वर्मा वय २२ वर्ष यास सांगितले की पेट्रोल पंपावर गर्दी आहे गर्दी कमी होईपर्यंत तु चाकात अडकून असलेली गिट्टी बाहेर काळ यावेळी वाहक शिववंदन वर्मा हा ट्रकच्या मागील चाकातील गिट्टी बाहेर काढत होता इतक्यात पंपावरील गर्दी कमी झाल्याने चालक मोहम्मद याशीम मोहमद याने फोन वर बोलत बोलत ट्रक सुरू केला यावेळी त्याला वाहक चाकाजवळ असल्याचे भान राहिले नाही यावेळी शिववंदन वर्मा हा मागच्या चाकात दबून जागीच ठार झाला यासंबंधी समुद्रपुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून ट्रक ताब्यात घेतला असून पुढील तपास प्रभारी ठाणेदार संदिप गाडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चॅप्टरने महाराष्ट्र दिनानिमित्त 'बदलता महाराष्ट्र' या विषयावर परिसंवादाचे केले आयोजन

महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी शिक्षण महत्वाचे माध्यम : प्रदीप दाते





वर्धा, २ मे २०२४: महाराष्ट्र राज्याला पुढे नेण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षणातूनच आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदल होऊ शकतात असे प्रतिपादन विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी केले. ते महाराष्ट्र राज्याच्या ६४व्या स्थापना दिनानिमित्त बुधवार, १ मे रोजी पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चॅप्टरच्या वतीने 'बदलता महाराष्ट्र' या विषयावर आयोजित परिसंवादात मुख्य वक्ता म्हणून बोलत होते. वर्धा येथील निसर्ग सेवा समितीच्या ऑक्सिजन पार्क येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीआरएसआय, वर्धा चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. राजेश लेहकपुरे होते. गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण सुलभ करण्यासाठी शिक्षण संस्थांनी पुढाकार घेतला पाहिजे, त्यासाठी कृतीशिल विचाराची गरज आहे अशी अपेक्षा व्यक्त करुन दाते पुढे म्हणाले की महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६४ वर्षात काय गमावले आणि काय मिळवले याचे मूल्यांकन करण्याची गरज आहे. त्यांनी कामगार दिनानिमित्तही आपले विचार मांडले. महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयातील असोशिएट प्रोफेसर डॉ. बालाजी चिरडे म्हणाले कि महाराष्ट्र ही देशातील सर्व विचारधारांची जन्मभूमी आहे. बदलत्या महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी शिक्षण प्रत्येकासाठी उपलब्ध करून देण्यावर आपण भर दिला पाहिजे. मुलांवर आपल्या आवडीचे शिक्षण लादण्याऐवजी त्यांना नैसर्गिकरित्या शिक्षण घेण्याची संधी दिली पाहिजे. महाराष्ट्रातील भाषा, शिक्षण आणि समाज यांच्यात झालेले बदल अधोरेखित करून युवकांनी आपल्या कलागुणांचा उपयोग करून युवा राष्ट्राला पुढे नेण्यात योगदान द्यावे असेही ते म्हणाले. निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे यांनी राष्ट्रविकासाचा पाया रचण्यात महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनोबा भावे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, सुब्बाराव आदी विचारवंतांच्या योगदानाचा उल्लेख केला. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच महाराष्ट्राने स्त्री शिक्षण, ग्रामीण विकास, नई तालीम, राष्ट्र भाषा या संदर्भात एक आदर्श स्थापित केला आहे असेही ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात डॉ. राजेश लेहकपुरे यांनी मराठी राजभाषा दिनाबाबत आपले विचार मांडले. बदलत्या महाराष्ट्राच्या विविध पैलूंवरही त्यांनी सविस्तर चर्चा केली.

कार्यक्रमाचे संचालन पीआरएसआय वर्धा चॅप्टरचे सचिव बी. एस. मिरगे यांनी केले तर उपाध्यक्ष प्रफुल्ल दाते यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने (जय जय महाराष्ट्र माझा...) करण्यात आली तर समारोप राष्ट्र वंदनेने करण्यात आला.

या प्रसंगी प्रो. आनंद पाटील, एड. नंदकुमार वानखेडे, नरेंद्र दंढारे, विनेश काकडे, प्रा. किशोर वानखेडे, डॉ. कोमल कुमार परदेशी, डॉ. मनोज मुनेश्वर, दामोदर राऊत, बा. दे. हांडे, डी. गोपाल, आकाश दाते, राखी, आरती कुमारी, वृषाली बकाल, प्रिया कुमारी, सुधीर कुमार, रजत बत्रा, विकास मिश्र, शिवम चौधरी, राजन उपस्थित होते.

शिबिरातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो – डॉ. उदय बोधनकर
जि.प. उच्च प्राथमिक शाळा थुगाव (निपाणी) येथे बाल संस्कार शिबीराचा समारोप

काटोल:–हेमराज सातपुते

सकस आहार व योग–प्राणायाम, सूर्य नमस्कार व व्यायाम अंगिकार करून उत्तम आरोग्याचा पाया मजबूत करता येतो. बाल संस्कार शिबिराच्या माध्यमातून बालकांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक अर्थात सर्वांगीण विकास होतो असे प्रतिपादन सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. उदय बोधनकर यांनी केले.

जि.प.उच्च प्राथमिक शाळा, थुगाव(निपाणी) ता.नरखेड येथे बालसंस्कार शिबीर समारोप समारंभाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक यादवराव चौधरी, प्रमुख वक्ते म्हणून कार्यकारी संचालक, कॉमनवेल्थ असोसिएशन फॉर हेल्थ डिसॅबिलीटी डॉ. उदय बोधनकर तर प्रमूख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी डॉ. निलेश वानखडे,फिजिओथेरपी तज्ज्ञ डॉ.सुधीर मंगरूळकर,सरपंच लताताई कंगाले, उपसरपंच अनिल देशमुख,अधिवक्ता अँड.उपेंद्र खंते, अँड शुभांगी खंते, कवी सुरेश राठोड, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष विनोद चौधरी, उपाध्यक्ष अनिता गोरे प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी डॉ. ओंकार चौधरी यांच्या द्वारे स्व.सूर्यकांता केशवराव चौधरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ आणि श्री.केशवराव चौधरी यांच्या अभिष्टचिंतन प्रित्यर्थ 'स्टुडंट ऑफ द इयर' हा विशेष पुरस्कार आरुषी टेकाडे, पार्थ हिवसे, पार्थ चौधरी, नक्ष लकडे यांना प्रदान करण्यात आले.शैक्षणिक,क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.





समर्पित शिक्षकांच्या झुंजार नेतृत्वाखाली दुर्गम ठिकाणच्या हुशार विद्यार्थ्यांनी केलेल्या उत्कृष्ट सांस्कृतिक आणि जिम्नॅस्टिक कामगिरीमुळे आम्ही आश्चर्यचकित आणि अत्यंत प्रभावित झालो असे उद्धार अध्यक्षीय भाषणात यादवराव चौधरी यांनी काढले.

महाराष्ट्र शासनाचा २१ लाख रुपयांचा विभागीय स्तरावर मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा प्रथम पुरस्कार मिळवण्यासाठी केलेल्या उत्कृष्ट शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे श्रेय मुख्याध्यापक धनंजय पकडे आणि सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांना जाते. असे प्रतिपादन गटविकास अधिकारी डॉ. निलेश वानखडे यांनी केले.

बाल संस्कार शिबिर मध्ये नरेंद्र बिहार (रोप स्किपिंग), अनमोल भोयर (मार्शल आर्ट), मंतशा शेख (स्वयंसिद्धा), धनश्री हिवसे (योगासन), वेदिका ठोंबरे (खो– खो), पूर्वा धोटे (रोप मलखांब), वासुदेव बोडखे (कॅलीग्राफी), निलेश डोके (नृत्य, क्रॉप्ट, रांगोळी), छाया सोनारे (चित्रकला), तनुजा सोनारे (स्टोन व लिपन आर्ट) आदींनी प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय पकडे,सूत्रसंचालन आर्या दिग्रसकर तर आभार प्रदर्शन निलेश शहाकार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जनकराव चौधरी, आरती पुरी, कांतेश्वर चौधरी, संगिता देशमुख, मनीषा बडोदेकर, सविता बडोदेकर, राजू चौधरी, पंढरी आखरे, पांडुरंग पाचोडे, निलेश शहाकार, आदींनी सहकार्य केले.

मुल ही देवाघरची फुल पूर्ण विकासासाठी मुलांना खेळू द्या – सभापती संजय डांगोरे

काटोल:– हेमराज सातपुते

उन्हाळ्याच्या सुट्ट्यामधे पूर्वीच्या काळी मुल मामाच्या गावाला जाउन मजा करायची. सुट्टीचा मनमुराद आनंद लुटायचे. परंतु आजकालच्या या कॉन्व्हेंट च्या युगामध्ये मुलांना चार भिंतीच्या आत मोबाईल आणि टीव्हीवरील गेम याशिवाय दुसरा मुलांना पर्याय नसतो. मुलं देवाघरची फुल असतात. मुलांना पूर्ण उमलण्यासाठी , विकसित होण्यासाठी मुलांना योग्य संस्कार सोबतच त्यांना खेळु देने महत्वाचे आहे. मुलांसोबत हितगुज करणे ,येतीहासीक कथा,गोष्टीच्या पुस्तके वाचणे यासोबत घरातील वरिष्ठ मंडळी सोबत हितगुज करू देणे, नातेवाईकांच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे आणि दुपारच्या वेळेला आराम सुद्धा करणे या सोबतच सर्व संस्कार मुलांना देणे ही काळाची गरज आहे .आजकाल मुले प्रत्यक्षात मैदानावर न खेळता टिव्ही मोबाईलवरच रममाण झालेले दिसते. शहरात उन्हाळी संस्कार शिबिरामध्ये मुलांकडे लक्ष दिले जाते .प्रत्येक मुलांना आपण पालकांनी व्यवस्थित लक्ष देण्याच्या बद्दल या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये मुलांना जे वर्षभरात आपण जे करू शकलो नाही, मुलांसाठी ते करण्याचे दिवस आहे .त्यांना खेळण्या बागडण्या सोबतच पुस्तकी ज्ञानासोबतच संस्कार देणे फार महत्त्वाचे असल्याने या नवीन पिढीमध्ये काही जुने आणि नवीन एकत्रित संस्कार देण्यासाठी सर्वसमावेशक गुण मुलांमध्ये येण्यासाठी पूर्ण विकास होण्याबाबत, मुलांना कुठलीही दडपण न देता त्यांना खेळू दिले पाहिजे, त्यांना बागडू दिले पाहिजे .त्या फुलांसारख्या मुलांना उमलु दिले पाहिजे. हे फार महत्त्वाचे आहे. असे विचार समाजसेवक तथा काटोल पंचायत समितीचे सभापती संजयजी डांगोरे यांनी वस्तीगृहातील विद्यार्थी आणि पालकांच्या निरोप समारंभात विचार व्यक्त केले. पालकांनी मुलांवर प्रेम जरूर करावे, परंतु ते आंधळे नसावे .अनावश्यक गोष्टीची मुलांनी जिद्द केल्यास पालक त्या गोष्टी उपलब्ध त्वरित करुन देतात. हे योग्य कि अयोग्य यावर जरूर विचार करावा .कारण कुठल्याही दगडाला मूर्ती करायचं असेल तर घाव सोसणे आवश्यक आहे. आपल्या मुलांचे भविष्य घडवायचे असेल तर त्रास होण्याची चिंता करु नका . उन्हाळ्याच्या उर्जावान सुट्या नंतर पुढील शैक्षणिक सत्रात विद्यार्थी आणि मुलांना एक नवीन दिशा गवसले अशी अपेक्षा सभापती संजयजी डांगोरे यांनी व्यक्त केली.

अवैद्यरीत्या गावठी मोहा दारूची हातभट्टी लावुन गावठी मोहा दारू गाळनारे पोलीसांच्या जाळ्यात

विरुळ/पुलगाव–याप्रमाणे आहे की वरील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी मुखबिरचे खाजीशीर खबरेवरून पंच व पो.स्टॉफचे मदतीने यातील नमुद आरोपीतांवर प्रो.रेड केला असता मौजा आपटी येथील वर्धा नदीचे काठावर आरोपी क्रमाक १ व २ हे संगणमताने गावठी मोहा दारुची हातभट्टी लावुन गावठी मोहा दारू गाळीत असताना आरोपी क्रमाक १ व २ मौक्यावर मिळुन आल्याने त्यांचे ताब्यात घेवुन मौक्यावरुन १) दोन मोठा लोखंडी भट्टीच्या ड्रम ज्यामध्ये १५० लिटर प्रमाणे ३०० लिटर गरम उकळता मोहा सडवा प्रती लिटर १००/– रु. प्रमाणे ३०००/– रु. २) दोन लोखंडी मोठे ड्रम प्रती ड्रम ८००/– रु.प्रमाणे किमंत १६००/– रु. ३) दोन जर्मनचे घमीले प्रती घमेले ५००/–रु. प्रमाणे किमंत १०००/– ४) पाच लोखंडी ड्रम प्रती ड्रममध्ये २०० लिटर प्रमाणे १००० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन प्रती लिटर १००/– रु. प्रमाणे १००००/– रु. ५) पाच लोखंडी मोठे ड्रम प्रति ड्रम ८००/– रु. प्रमाणे ४०००/– रु. ६) दोन प्लास्टीक कॅनमध्ये प्रती कॅन ५६ लिटर प्रमाणे ११२ लिटर गावठी मोहा दारु प्रती लिटर १५०/–रु.प्रमाणे १६८००/–रु. ७) दोन प्लास्टीक कॅन प्रती कॅन ३००/–रु. प्रमाणे किमंत ६००/– रु. ८) भट्टी साहीत्य ५८००/– रु. असा एकुण जुमला किमंत ११९,८००/– रु.चा माल मौका जप्ती पंचनामा कारवाई प्रमाणे पंचासमक्ष जप्त करुन आरोपी विरुध्द सदरचा गुन्हा नोंद.

सदरचा गुन्हा पोलीस निरीक्षक श्री.राहुल सोनवणे साहेब यांचे प्रत्यक्ष मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अमंलदार पो.हवा.चंद्रशेखर चुटे ब.क्र.११ पोलीस स्टेशन पुलगाव यांना मुखबीर कडुन खात्रीशीर खबर मिळाल्यावरुन प्रो.रेड केला असता आरोपी १) गणेश श्रीरामजी मेश्राम वय १९ वर्ष रा.विटाळा ता.धामणगाव जि.अमरावती २) प्रविण गुलाबराव नान्हे वय २५ वर्ष रा.सौजना ता.बाभुळगाव जि.यवतमाळ यांचे वर प्रो.रेड केला असता यातील आरोपी क्रमाक १ व २ हे संगणमताने गावठी मोहा दारुची हातभट्टी लावुन गावठी मोहा दारू गाळीत असताना आरोपी क्रमाक १ व २ मौक्यावर मिळुन आल्याने त्यांचे ताब्यात घेवुन मौक्यावरुन १) दोन मोठा लोखंडी भट्टीच्या ड्रम ज्यामध्ये १५० लिटर प्रमाणे ३०० लिटर गरम उकळता मोहा सडवा प्रती लिटर १००/– रु. प्रमाणे ३०००/– रु. २) दोन लोखंडी मोठे ड्रम प्रती ड्रम ८००/– रु.प्रमाणे किमंत १६००/– रु. ३) दोन जर्मनचे घमीले प्रती घमेले ५००/–रु. प्रमाणे किमंत १०००/– ४) पाच लोखंडी ड्रम प्रती ड्रममध्ये २०० लिटर प्रमाणे १००० लिटर कच्चा मोहा सडवा रसायन प्रती लिटर १००/– रु. प्रमाणे १००००/– रु. ५) पाच लोखंडी मोठे ड्रम प्रति ड्रम ८००/– रु. प्रमाणे ४०००/– रु. ६) दोन प्लास्टीक कॅनमध्ये प्रती



कॅन ५६ लिटर प्रमाणे ११२ लिटर गावठी मोहा दारु प्रती लिटर १५०/–रु.प्रमाणे १६८००/–रु. ७) दोन प्लास्टीक कॅन प्रती कॅन ३००/–रु. प्रमाणे किमंत ६००/– रु. ८) भट्टी साहीत्य ५८००/– रु. असा एकुण जुमला किमंत ११९,८००/– रु.चा माल मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदरची कार्यवाही मा.नरुल हसन पोलीस अधिक्षक सा.जिल्हा वर्धा, मा.डॉ.सागर कवडे अपर पोलीस अधीक्षक, मा.सहाय्यक पोलीस अधिक्षक पुलगाव श्री. राहुल चव्हाण यांचे मार्गदर्शनात यांचे मार्गदर्शनात श्री.राहुल सोनवणे पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन पुलगाव यांचे प्रत्यक्ष मार्गर्देशाप्रमाणे तसेच गुन्हे प्रकटीकरणाचे अंमलदार सुधिर लडके,चंद्रशेखर चुटे,रितेश गुजर,अमोल जिंदे,रवि जुगनाके,ओमप्रकाश तळ्हारी,विश्वजीत वानखेडे,चालक सिध्दार्थ सोमकुवर यांनी केली आहे.

ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट चा उपक्रम जिल्ह्यात बालविवाह शोध मोहीम सुरू
१७ बालविवाह थांबविण्यात संस्थेला यश

सौ.आरती गोसटकर कारंजेकर

देवळी (प्रतिनिधी)आज अक्षय तृतीया हा लग्न सोहळ्यासाठी साडेतीन मुहूर्तावर एक असल्यामुळे जास्तीत जास्त विवाह या मुहूर्तावर होतात. त्यामुळे या मुहूर्तावर बालविवाह सुद्धा मोठ्याप्रमाणात होतात.या मुहूर्तावर बालविवाह केल्यास अशा विवाहात सहभागी सर्व व्यक्तींना कारागृहाची हवा खावी लागू शकते. त्यामुळे असे विवाह करू नये आणि त्यात सहभागही नोंदवू नये, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट च्या वतिने जिल्ह्यात बालविवाह शोध मोहीम राबविण्यात येत असून छुप्या पद्धतीने होत असलेले बालविवाह थांबविण्याबाबत जिल्ह्य समन्वयक पियुष अशोककुमार यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्यात विविध ठिकाणी शोशल वर्कर शोध मोहीम राबवित आहे. १ मे २०२३ पासून या मोहिमेस सुरुवात झाली असून आतापर्यंत १७ बालविवाह ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट च्या वतीने थांबविण्यात आले आहे. या संदर्भात बाल संरक्षण विभागाला कळविण्यात आले आहे.यामधे तीन प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आल्या असल्याचे जिल्ह्या समन्वयक पियुष अशोककुमार यांनी सांगितले. बालविवाह होवु नये या करीता ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टचे जिल्ह्य समन्वयक पियुष अशोककुमार तथा शोशल वर्कर अक्षय तृतीया दिवसावर बारीक लक्ष ठेवून आहेत. जिल्ह्यात वर्धा, आर्वी, आष्टी–तळेगांव हिंगणघाट, तथा देवळी तालुक्यात नाचणगांव, गौळ,नागझरी क्लस्टर मधील गावात शोशल शोध मोहीम राबवून तालुक्यात तथा बाहेरील गावात

जिल्ह्यात बालविवाह होत असल्याची माहीती मिळताच जिल्ह्या समन्वयक म्हणून मी व जिल्ह्य समुपदेशन यांच्या माध्यमातून बालविवाह थांबविण्याबाबत आम्ही त्यांना प्रवृत्त करीत असतो आता पर्यन्त १७ बालविवाह आम्ही थांबविले असून तिन प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.वर्धा जिल्हा हा बालविवाह मुक्त व्हावा या करीता ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट प्रयत्न करीत आहे.
पियुष अशोककुमार
जिल्ह्या समन्वयक वर्धा



जाऊन बाल विवाह झाला का याचा गुप्त शोध घेऊन बालविवाह थांबविण्याकरीता पियुष अशोककुमार यांच्या मार्गदर्शनात शोधमोहीम राबवित आहे. कायद्यान्वये बालविवाह लावणे किंवा १८ वर्षाखालील मुलींचे विवाह लावणाऱ्याविरुद्ध कायद्यानुसार दोन वर्षे सक्तमजुरी व एक लाख रुपयापर्यंत दंडाची तरतूद आहे. बालविवाह प्रतिबंधक 'कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहे.व बालविवाह प्रतिबंधक कायदा त्याबाबतचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम लागू करण्यात आला आहे. यानुसार बालविवाह लावणे अजामीनपात्र गुन्हा आहे. ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्टच्या वतिने जिल्ह्यातील धार्मिक स्थळी जाऊन बालविवाह मुक्त अभियान राबविण्यात येत आहे. क्लस्टरमधील गावातील अंगणवाडी सेविका मुख्याध्यापक, ग्रामसेवक, यांना भेटून बालविवाह परिसरात झाला आहे का याचा आढावा घेतला जात असून सविस्तर उपक्रमाबाबत माहिती दिली जात आहे. देवळी तालुक्यात नाचणगांव, नागझरी, गौळ क्लस्टर मधील शोशल वर्कर आरती कारंजेकर, योगेश काबंळे विविध संस्थानात जाऊन बालविवाह उपक्रमाबाबत माहिती देण्यात येत असून बालविवाह करू नये असे आवाहन करण्यात येत आहे. ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट च्या वतिने मुलांच्या संरक्षणाच्या प्रश्नावर 'काळजी आणि संरक्षण' सोबतच बालविवाह या विषयावर शोशल वर्कर च्या माध्यमातून जनजागरण केल्या जाते. तसेच मुलांच्या कायद्याविषयी मोफत मार्गदर्शन केले जाते. बालविवाह मुक्त उपक्रमांतर्गत बालहक्क अभियान बालमजुरी बालहक्क, शाळाबाह्य मुलांची काळजी आणि संरक्षणाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. काही ठिकाणी बालविवाह होताना दिसत असेल तर शोशल वर्कर यांना कळवा किंवा स्थानिक पातळीवर अस्तित्वात असलेल्या बालसंरक्षण समितीला कळवुन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले . बालविवाह चळवळ प्रभावी करण्याची अत्यंत गरज असून सर्वांनी यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट च्या वतिने करण्यात आले आहे.

वाळूघाटात वाळूची चोरटी वाहतूक रात्रदिवस सरासपणे सुरुच



मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांना, पक्षाचे सहसंपर्क प्रमुख श्री. रविकांत बालपांडे ,जिल्हाप्रमुख श्रीकांत मिरापूरकर तथा तालुकाप्रमुख सतीश धोबे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या वणा नदीच्या पात्रात वाळूघाट आहे .

सदर वाळूघाटात वाळूची चोरटी वाहतूक रात्रदिवस सरासपणे जिल्ह्यातील देवळी, पुलगाव ,आर्वी ,वर्धा ,सेवाग्राम व सावंगी या सारख्या शहरात मोठ्या प्रमाणात होत आहे. ही चोरटी वाहतूक करताना सदर वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक रेती वाहून नेणारे वाहतूकदाराची वाहतूक सुरू आहे. सदर वाहतूक करताना बरेचसे वाहनाचे इन्शुरन्स संपले आहे. तर काही जे कागदपत्रे अपूर्ण आहे. आपल्या कार्यालयांतर्गत जिल्ह्यातील भरारी पथक या रेती चोरी वाहतूक करणारे ह्या रेतीमाफियाना क्षमतेपेक्षा अधिका– अधिक रेती वाहून नेणारे टिप्पर व ट्रक यांना दिसून येत नाही काय ? असा प्रश्न आमच्या शिवसेनेच्या वतीने आपणास विचारण्यात येत आहे. कारण चोरीची वाळू भरलेले टिप्पर हे हिंगणघाट येथील आयपीएस अधिकारी असलेल्या सृष्टी जैन मॅडम(परिविक्षा कालावधी) यांनी चार–पाच दिवसांपूर्वी चार ते पाच चोरी करणारे रेतीचे भरलेले टिप्पर पकडून पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे जमा केले. परंतु महसूल व उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय –वर्धा यांच्यामार्फत सदर टिप्पर व ट्रक पकडण्यात येत नाही. तरी राष्ट्रीय महामार्ग ने सदर ट्रक टिप्पर रेती चोरी सरासपणे मांडगाव मार्गे ,अलीपुर मार्गे ,वर्धा मार्गे ,वाहतूक करीत आहे .आपल्या या निष्काळजीपणामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडतो आहे .तरी आपणास या निवेदनाद्वारे विनंती करण्यात येते. या सर्व वाहनावर तात्काळ कारवाई करावी ,अन्यथा हिंगणघाट शिवसेनेच्या वतीने उग्र आंदोलन करण्यात येईल .यांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील.

सदर निवेदन देताना शिवसेना पक्षाचे उप तालुकाप्रमुख प्रकाश अनासाने नगरसेवक मनीष देवडे,शंकर मोहमारे, भास्कर ठवरे ,वर्धा तालुका प्रमुख सुयोग नवघरे उपस्थित होते

अनुसया माता जन्मदिन सोहळा संपन्न

नागपूर, दिलीप येवले–

दरवर्षी प्रमाणे अनुसया मातेचा जन्मदिन सोहळा ५ मे रोजी ट्रस्ट कॉलनी सोमलवार शाळे समोर खामला येथे नुकताच संपन्न झाला. सायंकाळी कर्मयोगी कमलामाताचे पुस्तकाचे विमोचन एडवोकेट उदय डबले व मान्यवर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या पुस्तकात भक्तांचे अनुभव व कर्मयोगी कमला माता आईचे चरित्र वर्णन केलेले आहे तसेच या पुस्तकाच्या लेखिका सुनिता गोखले यांचा सुद्धा सत्कार व पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी एड. उदय डबले, माजी नगरसेवक दिलीप दिवे, जवाहर वस्तीगृहाचे अध्यक्ष रमेश गिरडे, विजु सावरकर, मंडळाचे अध्यक्ष किशोर चन्ने, लेखिका सुनीता गोखले, लेखिका शशी भार्गव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दीप प्रज्वलन व त्यानंतर सरस्वती वंदना झाली मान्यवरांचे सती अनुसया माता चा जन्मदिवस सोहळ्यामध्ये मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रसंगी कर्मयोगी कमला माता यांचा व लेखिका सुनीता गोखले यांचा सत्कार करण्यात आला सर्व मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आलां. मंडळाचे अध्यक्ष किशोर चन्ने यांनी प्रास्ताविक केले तर विजय गिरडकर यांनी संचालन केले. बेंद्रेताई यांनी पसायदान म्हटलं यानंतर भजनाचा व सहभोजन कार्यक्रम झाला. अनेक भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भोजराज शास्त्रकार, एकनाथजी आडेकर, गुड्डू धुवारे, फुलचंद विनोद, दत्ता गणोरकर व भजन मंडळी मानसीताई, अर्चनाताई, कल्पनाताई, रजनीकांत खेडूलकर यांनी अथक परिश्रम घेतले.



पोलिस आयुक्तांच्या हस्ते हवालदार चांभारे यांचा सत्कार

पोलिस महासंचालक पदकाने गौरव



नागपूर, दिलीप येवले,

हवालदार दिनकर चांभारे यांना पोलिस महासंचालक पदक मिळाल्याबद्दल पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला. हवालदार चांभारे यांनी पोलिस सेवेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना हे पदक बहाल करण्यात आले आहे. चांभारे यांनी यापूर्वी नक्षल विरोधी अभियान, नागपूर येथे कार्य केले आहे. त्यांनी सेंट्रल ब्यूरो ऑफ इनवेस्टीगेशन उइख ब्यूरो नागपूर येथे काम केले आहे. तसेच झड. उीळाश ईतर षषळलश मध्ये कर्तव्य पाडले. त्यांची एकूण सेवा २६ वर्ष पूर्ण झाले आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय त्याच्या पत्नी, आई वडिलांना दिले आहे.

अहमदपू महात्मा बसवेश्वर जयंती निमित्त ध्वजारोहण व रक्तदान शिबिर

दै, जनप्रभात उपसंपादक/
राठोड रमेश पंडित



अहमदपूरः–क्रांतीसुर्य जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त बसवेश्वर चौक येथे भक्ती स्थळ तथा वीरमट संस्थांचे मताधिपती राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले सकाळच्या सत्रात नऊ वाजता बसवेश्वर चौक या ठिकाणी महात्मा बसेश्वर प्रतिमापूजन व ध्वजारोहण राष्ट्रसंतांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी आमदार बाबासाहेब पाटील माजी आमदार विनायकराव पाटील भाजपा प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके राजकुमार मजगे वसंतराव शेटकर भारताने शाम यादव गोविंद गिरी ओम पुणे नगरसेवक अभय मिरकले संदीप चौधरी पंचायत समितीचे माजी सभापती शिवाजी खांडेकर जि प सदस्य चंद्रकांत मद्दे काशिनाथ गाढवे विकास महाजन निखिल कासनाळे अमोल हमने शिवकुमार उट गे पत्रकार संघाचे अध्यक्ष विश्वंभर स्वामी रामलिंग तत्ता पुरे लक्ष्मीकांत असणारे किशोर कोरे अभिजीत पुणे प्रेम हमने हणमंत देवकते महादेव कासले संतोष कोटलवार वैजनाथ चौधरी संयोजन समितीचे अध्यक्ष गणेश शेटकर उपाध्यक्ष प्रशांत पाटील माधव बोडगे कार्याध्यक्ष महालिंग पुणे सचिव नागेश हेगणे सहसचिव गजानन गादगे मिरवणूक प्रमुख बालाजी कादवडे कोषाध्यक्ष योगेश शेटकर कोषाध्यक्ष संतोष निठूरे स्वागत अध्यक्ष शिवानंद मुस्तापुरे सह अनेक भक्त उपस्थित होते यावेळी नागेश हिंगणे व मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते या ४० बसब भक्तांनी रक्तदान केले. ++++++++++++++++विश्वगुरू संकल्पना बसवेश्वराचे लोकशाही व समानतेचा पाया असणारे महात्मा बसवेश्वर यांनी अनुभव मंडपाद्वारे जगातील पहिली संसद निर्माण केली आणि त्याद्वारेच भारताला विश्वगुरू निर्माण करण्याचे संकेत दिले होते ती संकल्पना आज प्रत्यक्षात येत असल्याचे भक्ती स्थळाचे प्रमुख राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी केले ––––––––––––––बसवेश्वर विचारावरच लोकशाही महात्मा बसवेश्वरांचे विचारे सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी होते कर्म हीच पूजा सांगणारे ते एकमेव संत होते त्यांच्या अनुभव मंडपाच्या आधारेच आजची लोकशाही चालत असल्याचे आमदार बाबासाहेब पाटील यांनी सांगितले ******समानतेचा संदेश देणारे संत महात्मा बसवेश्वर आणि जगातला अस्पृश्यता निर्मूलन व समानतेचा संदेश देणारे संत होते त्यांच्याच आदर्श संत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराजांनी विसाव्या शतकामध्ये काम केले असल्याचे भाजपा प्रदेश प्राप्ती गणेश दादा यांनी सांगितले

जैन समाजाचे देशाच्या विकासात मोठे योगदान-चंद्रशेखर बावनकुळे

सातारा/ जीवन मोहिते



जैन समाज हा नेहमीच समाजकार्यात अग्रेसर असतो आणि देशाच्या जडणघडणमध्ये आणि विकासातही जैन समाजाचा सिंहाचा वाटा आहे. भाजपा जैन प्रकोष्ठच्या वतीने पुणे येथे आयोजित जैन समाज महामेळाव्या प्रसंगी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. जैन बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने आपला मतदानाचा हक्क बजावा व महायुतीचे उमेदवार मुरली अण्णा मोहोळ यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आव्हान चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नुकतंच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जैन समाजाचे स्वतंत्र महामंडळ लवकरच निर्माण करू असे आश्वासन दिले त्याबद्दल भाजपा जैन प्रकोष्ठचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांनी युती सरकारचे आभार मानले व बावनकुळे साहेब यांनी स्वतंत्र जैन महामंडळ साठी केलेल्या पाठपुराव्या बद्दल बावनकुळे यांचा जैन समाजाच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. जैन समाज हा भारतीय जनता पक्षाचा पारंपारिक मतदार आहे आणि यंदाही जैन समाज महायुतीच्या पाठीशी उभा राहील असे भाजपा जैन प्रकोष्ठचे प्रदेशाध्यक्ष संदीप भंडारी यांनी मेळाव्यास मार्गदर्शन करताना सांगितले. मेळाव्याचे यशस्वी आयोजन भाजपा जैन प्रकोष्ठ पुणे शहराध्यक्ष महेंद्र सुंदेचा (मुथ्था) संघटन हीच शक्ती आहे या नात्याने यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. यावेळी मुख्य अतिथी म्हणून श्रीनाथ भिमाले, प्रवीण चोरबेले, स्वाती शिंदे, राजश्री शिळीमकर , कविता वैरागे, राजेंद्र बाठीया, अनिल भन्साळी, आदेश खिवंसरा, उत्तम बाठीया,सौरभ धोका, आनंद गादिया , दिलप कटारिया, योगेश जैन, बाळासाहेब कटारिया यांनीही मार्गदर्शन केले. काँग्रेस अल्पसंख्यांक आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विनोद सोळंकी, अक्षय परमार व सामाजिक कार्यकर्त्या सुनीता गुंदेशा यांनी कार्यकर्त्यांसह भाजपामध्ये प्रवेश केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश बोरा, मयुर सरनोत (वरवंडकर), जैन प्रकोष्ठ पुणे महामंत्री श्रीमल बेदमुथा,प्रकाश बाफना, निमेश शहा, प्रीती पाटील, श्रुती मेहता, स्नेहील मेहता, पोपट ओसवाल,उमेश ओसवाल, शुभम निखिल मंडलेचा, योगेश जैन, आशिष कटारिया, प्रीतम जैन, अभिजीत शहा, सुयोग शहा, आशिष ढालावत, शिल्पा शहा, सतीश पाटील, अमित जैन, नितीश शहा,संतोष जैन अधिक कार्यकर्ते प्रयत्नशील होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जैन प्रकोष्ठ चे युवा अध्यक्ष मयुर सरनोत (वरवंडकर) यांनी केले

कांद्याचा झाला वांदा जुन्नर बाजार समितीत कांद्याच्या भावात १०० रुपयांची घसरण

कोंढरीपाडा ग्रामस्थांचा लोकसभा, विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार

निर्यात बंदी फसवी निवडणुकीपूर्वीच जेएनपीटी बंदरात ४०० कंटेनर कांदा अडकला

पुणे शहर प्रतिनिधी इसरार शेख



वर्षभरात अनेक वेळा कांदा बंदी उठवल्याचे केंद्र सरकार सांगत असून प्रत्येक वेळेस ही घोषणा फक्त हवेतच राहिलेली असल्याचे मत महाराष्ट्रातील शेतकरी व्यक्त करीत आहे

कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर या ठिकाणी मुख्य बाजार आवारामध्ये ११३९६ पिशव्यांची आवक झाली असता मागील दोन दिवसाच्या तुलनेत प्रतवारीनुसार चांगल्या कांद्याला १७० ते २०० रुपये इतका भाव मिळाल्याचे बाजार समितीचे सचिव रुपेश कवडे यांच्याकडून बाजारभावाची माहिती मिळाली असून हाच बाजार भाव रविवारी २१० ते ३०० रुपये इतका मिळाला होता परंतु आजच्या बाजारभावात शंभर रुपयाची घट झाल्याचे दर्शनात आले आहे

निवडणूक तोंडावर आली की मतदानाच्या अमिषा पोटी शेतकऱ्यांना आम्ही काहीतरी देतोय असे दाखवून भासवण्याचा प्रयत्न सत्तेत असलेल्या सरकारकडून होत असतो असाच प्रयत्न केंद्र सरकारने आम्ही कांदा निर्यात करीत आहोत असं सांगितले असले तरी प्रत्यक्षात बाकी कांदा निर्यात करताना लागत असलेल्या कायदेशीर त्रुटी असल्यामुळे व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून घेतलेला कांदा दोन दिवसापासून जेएनपीटी बंदरात तसाच पडून आहे

दोन दिवसापूर्वी ज्या कांद्याला वाशी मार्केटमध्ये चांगल्या कांद्याला २२० ते ३०० रुपये भाव मिळाला परंतु निर्यात करण्यासाठी घेतलेला कांदा कंटेनर मध्ये भरून ठेवला परंतु त्यासाठी कायदेशीर परवानगी नसल्यामुळे ते कंटेनर त्याच ठिकाणी उभे असून त्याचा परिणाम बाजारभावावरती झाला असल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आणि सरकारनी निर्यात बंदी उठवल्याची घोषणा ही फसवी असल्याचे शेतकऱ्यांच्या ध्यानात आले असून हे सरकार शेतकऱ्यांच्या नुस्कानीला सरकार जबाबदार असून सरकारविरोधात तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कांदा निर्यात बंदी खरोखर उठवली आहे का याबाबत पणन अधिकारी त्याचप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता आम्हाला अजून त्याबाबतची कुठलीही पत्र प्राप्त झाले नसल्याचे कळले आहे त्यामुळे ही निर्यात बंदी निवडणुकीपूर्वीच सपशेल खोटी ठरली असून याचा फटका मात्र कष्टकरी शेतकऱ्यांनाच बसत आहे.






दै. जनप्रभात उरण तालुका
प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे

उरण दि १० मावळ लोकसभा मतदार संघाची निवडणूक १३ मे रोजी २०२४ आहे . यात पूणे जिल्हा व रायगड जिल्हयातील तालुक्यांचा समावेश आहे.निवडणूकीची तारीख जवळ आल्याने दिवसेंदिवस राजकीय वातावरण अधिकच तापू लागले आहे. त्यातच मावळ लोकसभा मतदार संघातील उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील कोंढरीपाडा येथील ग्रामस्थांनी आपल्या आराध्य ग्रामदैवत श्री हनुमंताच्या मुर्तीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकाला त्याने केलेल्या गैरकृत्याबद्धल एक वर्ष पूर्ण झाले आहे तरी त्या गुन्हेगाराला शासन होत नसल्याने लोकसभा व विधानसभेच्या निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. मागील गेल्या एक वर्षापासून आगरी कोंढरी ग्रामस्थ हे गावातील ग्रामदैवत श्री हनुमंताच्या मुर्तीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकाला त्याने केलेल्या गैरकृत्याबद्धल त्याला शासन व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत परंतु काही शासकीय आणि राजकीय हस्तक्षेपामुळे गुन्हेगार हा गावात मोकाट फिरत आहे.आगरी कोंढरी पाड्यात असणाऱ्या श्री हनुमंताच्या मुर्तीची विटंबना हि दिनांक ६ में २०२३ रोजी गावात राहणाऱ्या भालचंद्र नारायण पाटील या समाजकंटकाने केली होती. सदर इसमावर उरण येथील पोलिस ठाण्यात त्याने केलेल्या गुन्ह्याबाबत रितसर एफआयआर देखील नोंदविण्यात आलेली आहे. संपूर्ण गावकऱ्यांना कायद्यावर व शासकीय पोलीस यंत्रणेनेवर विश्वास होता की ग्रामदेवतेच्या झालेल्या विटंबनेला शासनातर्फे अथवा न्यायालया मार्फत योग्य ती फौजदारी कारवाई होईल अशी अपेक्षा नव्हे तर आशा होती, परंतु पोकळ शासकीय आश्वासनाद्वारे आणि राजकीय हस्तक्षेपामुळे ग्रामदेवतेच्या विटंबनेबाबत गुन्हेगारावर कोणतीही कारवाई न होता न्याय मिळण्यास दिरंगाई होत असल्याने संपूर्ण ग्रामस्थांमध्ये असंतोष व असमाधान व्यक्त करण्यात येत आहे. या कारणास्तव सर्व ग्रामस्थांनी येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकींवर बहिष्कार टाकण्याचा एकमताने निर्णय घेतला आहे.

गजानन च्या कुटुंबाला प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजने अंतर्गत मिळाले२ लाख

नरखेड तालुक्यातील मेंढला येथील दोघांना मिळाला लाभ



नरखेडप्रतिनिधीता–नरखेडतालुक्यातीलजलालखेडायेथीलभारतीयस्टेटबँकमध्येप्रत्येकखाताधारकसाठीविमायोजनाराबविल्याजातातजेणेकरूनकाहीघटनाघडल्यास त्या कुटुंबातील प्रमुखाला त्यांचा लाभ होतो असाच प्रकार मेंढला येथील गजानन भाऊराव चरपे यांच्या सोबत झाला पोटाच्या गंभीर आजारपणाने त्यांचा मृत्यु झाला तो त्या कुटुंबा चा प्रमुख होता त्याच्या कुटुंबात पत्नी दोन चिमुकल्या मुली आणि वयोवृद्ध आई असे त्यांचे कुटुंब होते पोटाच्या गंभीर आजारीपणामुळे त्यांचा मृत्यु झाला गजानन भाऊराव चरपे या खाते धारकाला ग्राहक सेवा केंद्र मेंढला विजय चरपे यांनी योग्य मार्गदर्शन करून प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना खाते काढते वेळीस काढुन घेतले त्यांचा फायदा सुध्दा त्यांना झाला वार्षिक ४३६ रुपयामध्ये निघणारा हा विमा योजना अंतर्गत त्यांना २ लाख रुपए मंजूर होऊन त्यांच्या पत्नीच्या खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे तसेच भारतीय स्टेट बैंक ऑफ जलालखेडा येथील शाखा व्यवस्थापक परमेश्वर बारई व मेंढला येथील ग्राहक सेवा केंद्र चे प्रमुख विजय चरपे यांनी संपुण गावातील नागरिकाना आवाहन केले आहे कि भारतीय स्टेट बैंक ऑफ जलालखेडा अंतर्गत येत असलेल्या प्रत्येक बिमा योजनेचा लाभ घ्यावा असे प्रत्येक खातेधारकांना आवाहन केले आहे। मेंढला येथील गजानन भाऊराव चरपे यांच्या पत्नी च्या खात्यामध्ये २ लाख जमा झाल्यावर ग्राहक सेवा केंद्र मेंढला येथे बोलावून त्याचे सांत्वन करण्यात आले त्यावेळी शाखा व्यवस्थापक परमेश्वर बारई ग्राहक सेवा केन्द्राचे मेंढला येथील विजय चरपे व बैंक मधील इतर कमचारी उपस्थित होते

प्रामाणिकतेने कार्य केल्यास यश नक्कीच लाभेल : पद्मश्री डॉ. शंकरबाबा पापळकर परिचय केंद्रास सदिच्छा भेट

नागपूर, दिलीप येवले– :



प्रामाणिकतेने तसेच कठोर परिश्रमपूर्वक काम केल्यास त्या कामाला नक्कीच यश मिळेल, असे प्रेरणादायी मार्गदर्शन पद्मश्री पुरस्कार घोषित, अनाथ मुलांचे नाथ आणि थोर समाजसेवक डॉ. शंकरबाबा पापळकर यांनी आज महाराष्ट्र परिचय केंद्राला भेटी दरम्यान केले. गुरूवार दिनांक ९ मे २०२४ रोजी राष्ट्रपतींच्या हस्ते डॉ. पापळकर यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार सोहळ्यासाठी डॉ. पापळकर यांच्यासोबत त्यांच्या मानसकन्या गांधारी आणि मानसपुत्र योगश दिल्लीत आले असून या सोहळ्यात उपस्थित राहतील. पुरस्कार सोहळ्याच्या पूर्वसंध्येला, डॉ. पापळकर यांनी महाराष्ट्र परिचय केंद्रास भेट दिली. यावेळी डॉ.पापळकर यांचे स्वागत उपसंचालक (माहिती) श्रीमती अमरज्योत कौर अरोरा यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन केले. यावेळी त्यांचे सोबत सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, श्री नितीन पाटील, संपादक– रोजगार नोकरी संदर्भ संजय नाथे, अनाम प्रेम संस्थेचे सदस्य प्रशांत भाट, मानसकन्या गांधारी आणि मानसपुत्र योगश यांचेही स्वागत श्रीमती अमरज्योत कौर अरोरा यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. डॉ. पापळकर यांनी त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अत्यंत आनंद आणि कृतज्ञता व्यक्त केली. हा पुरस्कार मला नाही तर अनाथ मुलांना मिळाला आहे, तसेच या मुलांसाठी काम करणे हे माझे जीवन आहे आणि मी माझ्या आयुष्याचा शेवटपर्यंत हे कार्य करत राहीन, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. डॉ. पापळकर यांनी समाजसेवेतील त्यांच्या कार्याबद्दल आणि अनाथ मुलांसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल माहिती देतांना सांगितले की, अमरावती जिल्ह्यातील परतवड्यात १४ फेब्रुवारी १९४२ रोजी त्यांचा जन्म झाला. धोब्याचा व्यवसाय पासून ते पत्रकारिता केल्यापासून ते रस्त्यावरच्या अनाथ, अपंग, गतिमंद आणि दिव्यांग मुलांच्या वेदनांनी त्रस्त झाल्याचे त्यांनी त्यांचा जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. वंचित घटकांसाठी संगोपन आणि पुनरुत्थानासाठी आपलं संपूर्ण जीवन समर्पित करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, १९९० च्या दशकात त्यांनी वझ्झर या गावात स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग बेवारस बालगृह नावाचा आश्रम स्थापन केला. या आश्रमात अपंग, बेवारस, गतिमंद आणि अपंग मुलांचा सांभाळ करून ते भारतात एक रोल मॉडेल बनले आहे. शासकीय कुठलेही अनुदान न घेता हा आश्रम सुरू आहे. समाजाकडून मिळणाऱ्या दानावर आणि शेगाव संस्थान आणि अंबादास पंथ बालगृहाचे संचालक प्रभाकर वैद्य यांच्याकडून मिळणाऱ्या मदतीवर हा आश्रम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. या मुलांना स्वावलंबी बनवणे हे त्यांचे ध्येय असल्याचे सांगत, या मुलांना त्यांचे नाव दिल्याचे त्यांनी सांगितले.

आश्रम सुरू झाल्यानंतर २०० मूले आश्रमात होती, असे सांगत, आश्रमातल्या ३० मूकबधिर–गतिमंद मुलामुलींचे लग्न लावल्याचे त्यांनी माहिती दिली. आतापर्यंत आश्रमातील १२ जण शासकीय सेवेत रुजू झाले आहेत आणि यासोबत त्यांना जगण्याचा अधिकार मिळाल्याचे सांगत, त्यांनी आनंद व्यक्त केला. सद्या त्यांच्या आश्रमात ९८ मुली व २५ मुले अशी एकूण १२३ मुले वास्तव्यास असून, डॉ. पापळकर त्यांचे संगोपन व शिक्षणापासून ते पुनर्वसन करीत असल्याचेही त्यांनी सांगतिले. तसेच आश्रमात डॉ पापळकर यांनी मुलांच्या सहायाने १५००० वृक्ष लावून वनराई फुलविली आहे. बेवारस आणि दिव्यांगांच्या पुनर्वसनावर त्यांनी लक्ष केंद्रित करत, दिव्यांगांच्या पुनर्वसनाबाबत यावेळी चिंताही व्यक्ती केली. शासकीय कायद्यानुसार १८ वर्षावरील मुलांना रिमांड मधून काढून टाकले जाते, याची खंत व्यक्त करत, १८ वर्षांपर्यंत ठेवणा–या रिमांड होम च्या कायद्यात आवश्यक बदल घडवून अशा मुलांसाठी संगोपन तसेच पुनर्वसनासाठी पाऊले उचलण्याची त्यांनी यावेळी इच्छा व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून दिव्यांग, मतिमंद, मुकबधीर, दृष्टीहीन आणि निराश्रित मुलांना आश्रय देऊन त्यांच्या संगोपनाची अतिशय कठीण जबाबदारी डॉ.पापळकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. या अतुलनीय कार्याची भारत सरकारने दखल घेऊन उद्या दि.०९ मे रोजी राष्ट्रपती भवनात होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना प्रतिष्ठित पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हिंगणघाट शहरामध्येच व्हावे याकरिता संघर्ष समितीचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधि,– अब्दुल कदीर बख्श



हिंगणघाट:– वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट येथेच वैद्यकीय महाविद्यालय होणार यासाठी जिल्हाधिकारी यांनी सुयोग्य जागेची निवड करण्यात यावी अशी घोषणा मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात घोषणा केली आणि त्यानुसार शासन निर्णय सुद्धा हिंगणघाट साठी करण्यात आला.घोषणा होऊन ५ महिन्याचा कालावधी लोटूनही मेडिकल कॉलेजसाठी जागेची निश्चिती न झाल्यामुळे बांधकाम निधीसाठी पुढील शासन निर्णय महाराष्ट्र सरकार कडून होऊ शकला नाही .ह्यात स्थानिक लोकप्रतिनिधींचा हलगर्जीपना कारणीभूत आहे असे आरोप शहर वासियांकडून होत आहे.विशेष म्हणजे २०२३–२४ च्या अर्थसंकल्पात ११ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची घोषणा महाराष्ट्र सरकार कडून करण्यात आली होती .त्यापैकी इतर सर्व महाविद्यालयाची जागा निश्चित होऊन ४०३ करोडचे बांधकाम अंदाजपत्रक निघून शासन निर्णय झाला आहे पण हिंगणघाटसाठी अजून पर्यंत असा निर्णय झालेला नाही.ह्या साठी स्थानिक आमदार आणि सरकारने लक्ष घालून प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागणे आवश्यक आहे. स्थाननिश्चितीबाबत शहरात उलट सुलट चर्चा सुरू असल्यामुळे मेडिकल कॉलेज संघर्ष समिती पुन्हा एकदा स्वयंसेवी संस्था आणि विविध राजकीय पक्षांना सोबत घेऊन कंबर कसलेली आहे. आधीच दोन दोन मिल शहरात बंद पडलेले असताना मागील १० वर्षात तालुक्यात एक पण मोठा उद्योग सत्ताधारी लोकप्रतिनिधी आणू शकले नाही त्यामुळे मोठ्या प्रमाणात शहरात आणि ग्रामीण भागात बेरोजगारी असताना अश्या वेळेस रोजगाराच साधन म्हणून ह्या महाविद्यालयाकडे शहरवासी बघत आहे. अश्या परिस्थितीत हे महाविद्यालय शहरात किंवा शहरापासून २–३ किलोमीटर अंतरावरच होणे गरजेचे आहे .दरम्यानच्या काळात वृत्तपत्रातील बातम्या व आमदार समीर भाऊ कुनावार यांचा दुजोऱ्याने हे महाविद्यालय वर्धा रोड वरील वेळा ह्या ठिकाणी असलेल्या साखर कारखान्याचा १८० एकर जागेमधून दान स्वरूपात मिळालेल्या ४० एकर जागेवर होईल असे वृत्त प्रसारित झाल्यामुळे शहरातील लोकांचा तोंडाचा घास पळवण्याचा प्रकार होताना दिसत आहे.हा एक प्रकारचा लोकांवर अन्यायच आहे अशी भावना व्यक्त होत आहे.मेडिकल कॉलेज साठी शहरातील जागाच किंवा २–३ किलोमीटर वरची जागाच केंद्रबिंदू राहील त्यामुळे हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातल्या सर्व ग्रामीण भाग आणि आजूबाजूच्या इतर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांना ते स्थान कमी वेळ्यात पोहचण्यास मदत होईल आणि शहराचा सुद्धा झपाट्याने विकास होईल. हिंगणघाट शहरातील जागेचा निर्णय न झाल्यास अजून एकदा मोठे आंदोलन उभे करण्याचा ध्यास संघर्ष समिती आणि राजकीय पक्षांनी घेतला आहे.वेळा हे शहरापासून १० किलोमीटर दूर असून आणि प्रदूषण मुक्त नसून तिथे टेक्सटाइल पार्क असल्यामुळे रुग्णांना त्रासदायक आणि आरोग्यास धोका राहील त्यामुळे हे स्थान सर्व लोकांना गैरसोयीचे आहे.याउलट हिंगणघाट शहर हे जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ असून चंद्रपूर जिल्हातील वरोरा,यवतमाळ जिल्हातील वणी,राळेगाव,पांढरकवडा आणि नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील शेकडो गावे हिंगणघाट बाजारपेठेला संलग्नित आहे. उपजिल्हा रुग्णालयाला जागून शासनाची जमीन उपलब्ध असून बसस्थानक ,रेल्वे स्टेशन,बाजारपेठ हे १–२ किलोमीटर अंतरावर आहे .त्यामुळे ते मेडिकल कॉलेज विद्यार्थ्यानं सोबत रुग्णांना सुद्धा गैर सोयीचं होणार नाही.मेडिकल कॉलेज हे जिल्हा रुग्णालयालाच लागून असायला पाहिजे त्यामुळे विद्यार्थांना त्रास होणार नाही .जिल्हा रुग्णालय हे शहरात आणि मेडिकल कॉलेज हे शहराचा बाहेर अशी स्थिती महाराष्ट्र मध्ये पहिल्यांदाच निर्माण होत आहे ते सुद्धा एका स्थानिक मोठ्या उद्योगपती नेत्याचा आर्थिक फायद्यासाठी आणि त्या नेत्याचा जवळचा उद्योगपती लोकांसाठी .ह्यामुळे शहर वासियांवर हा एक अन्याय होणार आहे .म्हणून नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,हिंगणघाट हे हिंगणघाट शहरातच व्हावे यासाठी जिल्हाधिकारी ह्यांना भेटून संघर्ष समितीने निवेदन दिले .यापूर्वी विशेष म्हणजे दोनदा जिल्हाधिकारी साहेब ह्यांना भेटून उपलब्ध शासकीय जागेचा सातबारा देऊन जागेची माहिती दिली तरी सुद्धा वेळा येथील खासगी जागेचाच विचार करून त्याजागेत काय रहस्य दडलेले आहे हे एक कोडे नागरिकांना उलगडलेले नाही. निवेदन देते वेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष सुनील पिंपलकर ,कार्याध्यक्ष वासुदेव पडवे,सहकार्याध्यक्ष जगदीश वांदिले,सचिव सुरेंद्र टेंभूर्णे ,सहसचिव अक्षय बेलेकर, शिवसेना जिल्हाध्यक्ष (उबाठा) श्रीकांतजी मिरापुरकर, शिवसेना तालुकाप्रमुख सतीश धोबे,माजी नगरसेवक मनीष देवढे,प्रकाशजी अनासने,शंकरभाऊ मोहमारे, भास्करभाऊ ठवरे, ओबीसी संघर्ष समिती अध्यक्ष शशिकांतजी वैद्य, विमाशी चे जिल्हा अध्यक्ष विष्णुजी इटनकर, बालुभाऊ वानखेडे, सौ. रागिणीताई शेंडे ईत्यादी उपस्थित होते.

चाणजे मधील शेतजमिनी नापीक झाल्याने आगामी होणाऱ्या लोकसभा विधानसभा निवडणुकीवर चाणजे ग्रामस्थांचा बहिष्कार.





उरण दि १० उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे चाणजे येथे सुमारे १०० हुन अधिक कुटुंब शेतकऱ्यांच्या २५० एकर जमिनीवर खारफुटीचे अतिक्रमण झाले आहे. शिवाय शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनीचा इतिहास न पाहता सी.आर. झेड मध्ये दाखविल्याने स्वतःच्या मालकीची शेती असून सुद्धा शेतकरी (मालक)ही जमीन कोणाला विकू शकत नाही तसेच या क्षेत्रात कोणतेही पीक घेऊ शकत नाही.अशा गंभीर समस्या मध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांच्या या महत्वाच्या समस्येकडे लोकप्रतिनिधीसह सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी तसेच महाराष्ट्र शासनाने नेहमी दुर्लक्ष केले आहे. परिणामी स्वतःच्या मालकीची शेती असूनही येथील शेतकरी स्वतःच्या मूलभूत न्याय हक्कापासून वंचित राहिला आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून श्री हनुमान मंदिर, कोंढरीपाडा, करंजा, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे एका बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत चाणजे शेतकऱ्यांच्या कोणत्याही समस्या न सुटल्याने येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीवर एकमताने बहिष्कार टाकून निवडणुकीत मतदान न करण्याचा निर्णय घेण्यात आला होता .या समस्याची दखल घेत उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांनी सदर शेतकऱ्यांना बैठकीला बोलाविले होते. २२/३/२०२४ रोजी झालेल्या या बैठकीत मात्र कोणतेही प्रत्यक्ष कृती न करता प्रशासनातर्फे केवळ आश्वासन देण्यात आले. त्यामुळे पुन्हा एकदा शासनाकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकणे हाच एकच पर्याय उरला असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. गेल्या ५० ते ६० वर्षापूर्वी मौजे चाणजे खाडीतील शेतजमिनीवर मोठ्या प्रमाणात भातशेती केली जात होती, परंतु कालांतराने बंदिस्त तुटत गेल्यामुळे समुद्राचे पाणी मोठ्या प्रमाणात शेतीत येऊ लागले परिणामी येथील शेतजमिनीत खारफुटीचे अतिक्रमण होत गेले.अनेक वृक्षांचे, कांदनवळचे शेतात अतिक्रमण झाले. अशा प्रकारे मौजे चाणजे येथील शेतजमीन समुद्राच्या पाण्याखाली आणि खारफुटीखाली गेली.चाणजे येथील शेतजमिनीचा इतिहास न पाहता आत्ताच्या परिस्थितीचा विचार करून सरकारी यंत्रणा व हायकोर्ट कडून पिकती भातशेतीची जमीन सी.आर.झेड. व खारफुटीत दाखवण्यात आली आहे. परिणामी ७/१२ उताऱ्यावर शेतकऱ्यांची नावे (भातशेती पीक) असलेली शेतजमीन ना पिकवू शकत, ना विकू शकत अशी शून्य मोल झाली आहे.आजतागायत येथील शेतजमीनीचे अस्तित्व टिकवण्यासाठी व शेतकऱ्यांना एवढ्या गंभीर समस्येतून न्याय देण्यासाठी येथील पुढारी,नेत्यांनी विधानसभा,विधान परिषद सभागृहात किंवा इतर योग्य ठिकाणी हा गंभीर प्रश्न,समस्या उपस्थित केला नाही. त्यामुळे या विषयाच्या अनुषंगाने जोपर्यंत येथील बाधित शेतकऱ्यांना न्याय भेटत नाही तोपर्यंत येणाऱ्या लोकसभा,विधानसभा निवडणुकीवर मौजे चाणजे येथील बाधित शेतकऱ्यांद्वारे बहिष्कार टाकण्याचे ठरले आहे.या संदर्भात अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की रविवार दिनांक १७/०३/२०२४ रोजी सायंकाळी ठीक ६:०० वाजता हनुमान मंदिर कोंढरीपाडा येथे सभा आयोजित केली होती.शेतकऱ्यांनी आपले विचार मांडून येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत मतदान न करण्याचा एकमुखी निर्णय घेतला होता. त्यानंतर प्रशासनाने बैठकीला बोलाविले. प्रशासनासोबत बैठक संपन्न झाली.मात्र कोणतेही ठोस उपाययोजना करण्यात आले नाही. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी लोकसभा, विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा एकमुखी निर्णय घेतला असल्याची माहिती चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी दिली.या संदर्भात विविध बैठका घेउन, शासनाला पत्रव्यवहार करून चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे, सेक्रेटरी निशिकांत म्हात्रे, खजिनदार नितीन म्हात्रे, परशुराम थळी, कृष्णा पाटील, रुपेश म्हात्रे,सुरेश थवई, धर्मेंद्र ठाकूर, अनिकेत ठाकूर, गणेश म्हात्रे, चैतन्य थळी,मंगेश म्हात्रे आणि इतर शेतकरी बांधवांनी वेळोवेळी आवाज उठविला आहे. शेतकरी प्रतिनिधी व तहसीलदार व इतर अधिकारी यांच्यात या विषयावर चर्चा झाली मात्र कोणत्याही प्रकारचा तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी लोकसभा व विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

घाटनांद्रा घाटात बेवारस दुचाकी पोलिसांनी केली जप्त;बोरमाळ तांड्या जवळील घटना

सोयगाव प्रतिनिधी भावराव मोरे



दि.१०....सोयगाव तालुक्यातील बोरमाळ तांडा गावाजवळ असलेल्या घाटनांद्रा घाटाच्या दुसऱ्या वळणावर शुक्रवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास बेवारस दुचाकी उभी असलेली आढळून आली सोयगाव पोलिसांनी तातडीने बेवारस दुचाकी चा पंचनामा करून ही दुचाकी बनोटी पोलीस दूरक्षेत्रात जमा केली आहे

घाटनांद्रा घाटाच्या दुसऱ्या च वळणावर एम एच–२३ व्ही–२३४० ही दुचाकी बेवारस उभी असल्याची माहिती बनोटी उपनिरीक्षक शेख रज्जाक हुसेन यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेत या बेवारस दुचाकी ची तपासणी केली या दुचाकीच्या जवळपास कोणतेही संशयित वस्तू आढळून आलेल्या नसल्याचे पोलिसांनी सांगितले दरम्यान ही दुचाकी बीड जिल्ह्यातील असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे या दुचाकीची ओळख पटवून कागदपत्रे घेऊन बनोटी पोलीस दूरक्षेत्रात येण्याचे आवाहन उपनिरीक्षक शेख रज्जाक हुसेन यांनी केले आहे....

वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या ४८४ व्या जयंतीनिमित्त राजुर येथे विनम्र अभिवादन.





दै, जनप्रभात उपसंपादक/ राठोड रमेश पंडित

अहमदपूर:– ग्रामपंचायत टेंभुर्णी रोड राजूर चौकात तालुका अहमदपूर जिल्हा लातूर येथील वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या ४८४ व्या जयंती निमित्त चौकामध्ये वीर शिरोमणी महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, यावेळी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य नरसिंग सोळंके, शिवसेना कार्यालय प्रमुख, मास संघटनेचे तालुकाध्यक सुभाष गुंडीले , भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष भगवान सोळंके, ग्रामपंचायत सदस्य नितीन सोळंके, भीमराव कच्छवे, अनुप सोळंके, सागर राजपूत सर, हनुमंतराव कच्छवे, अनिल सोळंके, , लखन कच्छवे, प्रल्हाद चव्हाण, आशिष सोळंके, भगत कचवे, माधव चलवदे, मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

सावता परिषदेचे संस्थापक कल्याण काका आखाडे यांचा झंझावाती दौरा महायुतीच्या उमेदवार पंकजा ताई मुंडे यांना गतवैभव मिळवून देणार!

तेलगाव प्रतिनिधी सोमेश्वर सोनटक्के





लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होऊन महायुतीकडून माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उमेदवारीची घोषणा होताच संबंध बीड जिल्ह्यात सर्वात आधी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण काकाकडे यांनी अत्यंत विचारपूर्वक त्यांच्या विजयासाठी काय करता येईल याचा सांगोपांग विचार करून इतर मागासवर्गीय मधील बहुतांश संघटनेच्या प्रतिनिधीची व्यापक स्वरूपात बैठक घेऊन प्रचाराचे रणशिंग फुंकले होते याची प्रचिती म्हणून ताईच्या विजयासाठी जिल्हाभरातील सर्वच तालुक्यातील प्रमुख गावात बैठनाचे सत्र सुरूच ठेवून पंकजाताई ह्याच खासदार होणे का गरजेचे आहे याचा ठिकठिकाणी झालेल्या बैठकीत व हा पोहोच केल्याने आता प्रत्यक्ष निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांच्या एकूण मतदानात मोठी वाढ होऊन मताधिक्य वाढण्याचे काम आकडे काका यांच्या माध्यमातून होत असल्याचे दिसून येत आहे त्यांनी एक महिनाभर सातत्याने पायाला भिंगरी बांधून प्रचार दौरा केल्याचे एकंदरीत स्वरूपात फलित दिसून येत आहे. बीड लोकसभेच्या माहितीचे उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी विविध भागात सध्या प्रचारात मुसंडी मारून विरोधी उमेदवाराला कसे चित्रपट करता येईल याचाच विडा उचललेला आहे जिल्ह्यातील सर्वोच्च निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांचा विचार केला असता सर्वात अनुभवी, पाठीशी राजकीय वारशाचे गाठोडे, मात्तबर आणि अभ्यासू नेतृत्व , एखादा प्रश्न हाती घेतला की तो तडीस नेणे आणि सर्वसामान्य शेवटच्या घटकातील समुदायांचे प्रश्न मानून ते सोन्याच्या दृष्टीने असलेले कसं त्यांच्या नेतृत्वात दिसून येते सार्वजनिक जीवन जगताना कसलेही आव्हान आले तरी त्याच्याशी दोन हात करत आपण झेलण्याची किमया यांच्या नेतृत्व दिसून येते. गेला एक ते दीड महिन्यापासून कल्याण काका आखाडे जिल्हाभरातील आपल्या सहकार्यांना सोबत घेऊन गाव तिथे भेट आणि बैठक याचा अवलंब करत असून अंबाजोगाई केज धारूर वडवणी माजलगाव आष्टी परळी गेवराई पाटोदा शिरूर कासार बीड या सर्व तालुक्यात सरकलनिहाय बैठकाचे नियोजन करून सर्व घटकातील मतदारांना भूमिका स्पष्ट करून पटवून दिल्याने कल्याण काकडे यांच्या प्रयत्नाला यशाची झालर लाभत असून येणाऱ्या चार जून रोजी विजयाचा गुलाल पंकजाताई यांच्यवर पडणार आहेत यात शंकाच नाही.या वेळी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे यांचं संघटन कौशल्य, शिस्तबद्धता याचेही दर्शन जगासमोर आले.डॉ.राजीव काळे,विष्णू खेत्रे,किशोर राऊत,दिगंबर राऊत,विजय धायगुडे,धनराज शिंदेकर, बालासाहेब राऊत,मंगेश बलुतंकर हे रात्रंदिवस मेहनत घेत आहेत.

नागरिकांना भागवतातुन समाजजोडण्याची प्रेरणा मिळावी.! रविंद्र महाराज विलायतकर

गौळ (वार्ताहर) श्रीक्षेत्र गौळ तथा पंचक्रोशीसह महाराष्ट्रातील दिव्यतेज तपोनिधी संत लोटांगण महाराज वारी परंपरेच्या वारकरी सांप्रदायाच्या भक्तीपंथावर अद्भूत अशी बावीस वर्षे वारी करणारे लोटांगण महाराज व त्यांच्या कृपाशिर्वादानेच चौपन्न वर्षे पर्यंत वारीची अखंड परंपरा चालविणारे निष्काम कर्मयोगी प्रेममुर्ती सद्गुरु बाबाराव खराबे महाराज यांच्या जन्म शताब्दी निमित्त गौळ येथे संत बाबाराव खराबे महाराज संस्थानात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ अखंड हरिनाम संकीर्तन सोहळा ५ मे ते १२ मे पर्यंत आयोजित करण्यात आला आहे. या कार्यकाळात भागवत कथा सोबतच धार्मिक कार्यक्रम तथा हरिकिर्तन आयोजित असुन यातुन नागरिकाना समाज जोडण्याची प्रेरणा मिळावी या करीता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे रविंद्र महाराज विलायतकर यांनी नवराष्ट्र शी बोलताना आपले मत व्यक्त केले गौळ येथे संत खराबे महाराज संस्थानात सद्गुरू दौलत महाराज अलोणे यांची मुर्ती स्थापन झाल्या पासून त्यांची पुण्यतिथी सुरु करण्यात आली. त्यांचा पुण्यतिथी सोहळा व विद्यमान उत्तराधिकारी संतसेवक रविंद्र विलायतकर महाराज यांच्या सेवेला बारा वर्षे पूर्ण झाली म्हणून प्रथम तपपुर्ती सोहळ्या निमित्त श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम संकिर्तन सोहळा संपन्न होत आहे. रविंद्र महाराज विलायतकर हे बारा वर्षांपासून पंढरपूर पर्यंत पायदळ दिंडी घेऊन जातात. बाराही महिने ते बगर पादत्राणाने रहातात. समाजातील लोकच माझे मायबाप असून मी समाजातील लोकांसाठीच जगत असून लोकांनी सुखी, निरोगी, निर्व्यसनी रहावे याकरीता भागवत कथेचे आयोजन करून



समाजप्रबोधन कार्यक्रम राबवित असल्याचे सागितंले.यातुन समाज एकत्र येत असल्याने त्यांना मार्गदर्शन, त्यांना संताचा दृष्टांत सांगुन कोणीही माणूस अस्पृश्य नाही तर सर्व परमेश्वराची लेकरे असून माणसाने माणसाशी माणसाप्रमाणेच वागण्याची शिकवण दिल्या जात आहे.निसर्गाने सायकलचक्र निर्माण केले असून शिक्षणासाठी शिक्षक,आरोग्यासाठी डॉक्टर, दरोडेखोरासाठी पोलीस,तर समाजपरिवर्तना करीता साधुसंताची निर्मिती केली असल्याने आमचे काम अंखडपणे सुरू ठेवून नागरीकांच्या कल्याणासाठी ही चळवळ सुरू असल्याचे रविंद्र महाराज विलायतकर यांनी सांगितले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४ २२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९
(या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI No : MAHMAR/२०२०/८२२४२